रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १२८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५
किंमत ४ ₹

## आजपासून वादळी पावसाचा इशारा

**रायगड :** रायगड जिल्ह्यामध्ये बुधवारी (दि.१५) पासून ते शनिवारी (दि.१८) ऑक्टोबर या कालावधीत वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दिवाळीच्या निमित्ताने फटाके, कंदील विक्रीचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या पावसामुळे या व्यवसायावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. भात कापणीलादेखील सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरीदेखील मोठ्या संकटात सापडण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मागील आठवड्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला.

पान २ वर

## पीएनपी नाट्यगृहात होणार संविधानाचा जागर

**अलिबाग :** यंदाचे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमातून संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जाणार आहे. यानिमित्त पीएनपी नाट्यगृहात दि. १६ व १७ ऑक्टोबर रोजी दोन दिवस कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'गौरव गाथा संविधानाची' या कार्यक्रमाची संकल्पना ॲड. आशिष शेलार, मंत्री सांस्कृतिक कार्य यांची असून, या कार्यक्रमास मार्गदर्शन डॉ. किरण कुलकर्णी, सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांचे लाभले आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी

पान २ वर

### वेधक

## भीषण आगीत १२ जण होरपळले

**नवी दिल्ली :** राजस्थानातील जैसलमेर येथे मंगळवारी (दि. १४) प्रवाशांनी भरलेल्या बसला आग लागली आहे. धावत्या बसला लागलेल्या आगीत १२ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला असून काही जण जखमी आहेत. जखमींना उपचारासाठी जवाहिर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर बस जैसलमेरहून जोधपूरला चालली होती. बसमध्ये एकूण ५७ प्रवासी होते. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. जोधपूरकडे जात असतानाच वार म्युझियमजवळ अचानक बसमधून धूर निघू लागला आणि पाहता पाहता बस आगीच्या भक्षस्थानी गेली. बसला आग लागताच काही प्रवाशांनी खिडकी आणि दरवाजातून बाहेर उड्या घेतल्या.

## खैर तस्कराला ठोकल्या बेड्या

**महाड :** महाड-पंढरपूर रस्त्यावर अवैध खैराची वाहतूक करणाऱ्या वाहनासह चालकाला पकडण्यात आले आहे. वनखात्याने केलेल्या कारवाई खैराची अवैध वाहतूक उघडकीस आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मुंबई व राष्ट्रीय महामार्गावरील राजेवाडी गावाजवळील उड्डाण पुलाजवळ वनखात्याचे कर्मचारी गस्त करीत असताना एमएच २३ डब्ल्यू २७७८ या या क्रमांकाची पिकअप संशयास्पद आढळल्याने तिची तपासणी केली असता खैराचे सोलिव नग ९ घनमीटर ०.००६९ व गाडीच्या हौदामध्ये खैर लाकूड मिळाले. या खैराच्या मालाची वाहतूक

पान २ वर

## सोन्या-चांदीला पुन्हा झळाली

सोन्या-चांदीचे दर दररोज नवनवे उच्चांक गाठत आहे. या वर्षात सोन्या-चांदीच्या दरात जबरदस्त तेजी आली आहे. सोन्या-चांदीने १ लाखाचा टप्पा याआधीच पार केला असून, आता चांदीचे २ लाखाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. तसेच आता दिवाळी आणि लग्नसराईचा हंगाम सुरू होणार आहे. या काळात हमखास सोन्या-चांदीची खरेदी करण्यात येते. मात्र, सोन्या-चांदीचे दर गगनाला भिडल्याने आता सर्वसामान्य ९ कॅरेट सोन्याच्या दागिन्यांकडे वळले आहेत.

दिवाळीपूर्वीच सोन्या-चांदीच्या दराचे फटाके फुटत आहेत. सोन्या-चांदीतील तेजी वायदे बाजाराप्रमाणे

पान २ वर


## लैंगिक छळाला कंटाळून आत्महत्या

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत स्वयंसेवकांकडून झालेल्या सततच्या लैंगिक छळामुळे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचे सांगत एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने आत्महत्या केली आहे. केरळच्या तिरुवअनंतपुरम जिल्ह्यात ही घटना घडली आहे. आत्महत्येच्या आधी त्याने आरएसएसवर अनेक गंभीर आरोप केल्याने देशभरात खळबळ उडाली आहे. आनंदू अजि असे या २६ वर्षीय इंजिनिअरचे नाव आहे. तिरुवअनंतपुरमच्या थम्पनूर येथील एका लॉजमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला. आनंदूने ज्या दिवशी आत्महत्या केली, त्याच दिवशी त्याने शेड्युल्ड केलेली पोस्ट इन्स्टाग्रामवर झळकली. त्यात त्याने आत्महत्येचे धक्कादायक

पान २ वर

### निवडणूक आयोगाच्या विरोधात

# महाविकास आघाडीची वज्रमूठ





- सदोष मतदार याद्या दुरुस्त करा
- शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची मागणी

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रात सदोष व दुबार नावांच्या मतदारयाद्या असल्याचा दावा करीत महाविकास आघाडीच्यावतीने निवडणूक आयोगाविरोधात वज्रमूठ आवळली आहे. दरम्यान, मंगळवारी (दि.१४) मुख्य निवडणूक अधिकारी यांची भेट महाविकास आघाडीने घेतली. दरम्यान, मतदारयादी सदोष व बनावट दुबार नावे असल्याचे पुरावेदेखील दाखविण्यात आले. मतदारयादी निर्दोष होऊन दुरुस्त होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी केली.

### आज होणार बैठक

**मुख्य निवडणूक अधिकारी, निवडणूक आयुक्त आदी अधिकाऱ्यांसमवेत बुधवारी (दि.१५) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास मुंबईत बैठक घेण्यात येणार आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसोबत ही बैठक होणार आहे. या बैठकीत दुबार व सदोष मतदार याद्यांबाबत चर्चा केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.**

यावेळी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शिवसेनेचे नेते उध्दव ठाकरे, मनसेचे नेते राज ठाकरे, शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, माजी आ. बाळाराम पाटील, संजय राऊत, अनिल देसाई, आदित्य ठाकरे, अनिल परब, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, वर्षा गायकवाड, शेकापचे राज्य कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, प्रकाश रेड्डी, डॉ. अजित नवले, शैलेंद्र कांबळे, बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई आदींसह राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस, शेकाप, मनसे, सीपी कम्युनिस्ट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

> **मतदारयांद्याच्या घोळाबाबत महाविकास आघाडीच्या प्रमुख मंडळींनी आज निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांना निवेदन देण्यात आले आहे. बुधवारी दुपारी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे. या बैठकीला महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.**
> – जयंत पाटील, सरचिटणीस, शेतकरी कामगार पक्ष

मुंबई येथील मंत्रालयात जाऊन महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. सदोष मतदार याद्यांचा पाढाच वाचून दाखविण्यात आला. बाहेरील मतदारांची नावे मतदार यादीत दुबार असून, बनावट यादी तयार करण्यात आली आहे. सदोष मतदार याद्यांमुळे गैरप्रकार चालत असल्याची माहिती महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिली. पनवेल तालुक्यामध्ये दुबार नावे असलेली नावे अनेक आहेत. दुबार मतदार याद्यांचा पाढाच शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील यांनी निवडणूक अधिकारी यांच्यासमोर वाचून दाखविला. आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. निवडणूक विभागामार्फत हालचाली

पान २ वर

## दर २० दिवसांनी होणार निवडणुका

### नोव्हेंबरमध्ये नगरपालिका, तर डिसेंबरमध्ये होणार जिल्हा परिषदेचे मतदान

- राज्य निवडणूक आयोगाची तयारी सुरू
- लवकरच प्रशासन राज येणार संपुष्टात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

दर वीस दिवसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याची माहिती समोर आली आहे. नोव्हेंबरमेध्ये नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. तर, त्यानंतर २० दिवसांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुका, तर शेवटी महानगरपालिकेच्या निवडणुका होणार असल्याची खात्रीशीर माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

जानेवारीच्या शेवटापर्यंत सर्व निवडणूका पूर्ण करण्याची राज्य निवडणूक आयोगाची तयारी सुरु आहे. जिल्हा परिषद सदस्य आणि अध्यक्षपदाची सोडत काढण्यात आली आहे. काही दिवसांत महापालिका आरक्षणाची सोडत निघणार असून, प्रभाग रचनेला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे नोव्हेंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांवरील प्रशासन राज संपुष्टात येऊन लोकप्रतिनिधींचे राज्य येणार आहे.

राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी नगर विकास विभागांचे अपर मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, उपसचिव प्रियांका कुलकर्णी, छापवाले, उपसचिव विद्या हम्पय्या, अनिरुद्ध जेवळीकर यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील २४७ नगर परिषदांपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी व ११ पदे अनुसूचित जमातीसाठी आणि ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. तर, १३६ पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

## स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मार्ग मोकळा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतर्गत कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत पाच आणि पंचायत समितीमध्ये दोन सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या

पान २ वर

## कुर्डूसमध्ये शिंदे गटाला दणका



असंख्य कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

शिंदे गटातील शिवसेनेच्या मनमानी कारभाराला कंटाळून कुर्डूसमधील कामतवाडी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. शेतकरी कामगार पक्षात गेल्या अनेक दिवसांपासून इनकमिंग सुरु झाली आहे. त्यामुळे शिंदे गटाला दणका मिळत असल्याचे चित्र आहे.

शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, आत्माराम पाटील, मो.रा. म्हात्रे, विलास म्हात्रे, अमोल पिंगळे, संतोष पिंगळे, अतुल पाटील आदी पदाधिकारी, खारेपाट विभागातील ज्येष्ठ व तरुण कार्यकर्ते व नवनिर्वाचित कार्यकर्ते उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना शिंदे गटामध्ये कुर्डूसमधील कामत ठाकूरवाडीमधील ग्रामस्थ व महिला काम करीत होते. परंतु, त्यांची घोर निराशा करण्यात आली. अखेर शिंदे गटातील मनमानी कारभाराला कंटाळून कामतवाडीमधील असंख्य कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये प्रवेश केला. तळागाळातील कार्यकर्त्यांशी नाळ जोडलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन जाहीर पक्ष प्रवेश केला. या प्रवेशामुळे शिंदे गटामध्ये भगदाड पडू लागले असल्याची चर्चा असून, शिंदे गटाला दणका मिळाला आहे.

## रायगडवर अल्पवयीन प्रसूतीचे संकट

प्रमोद जाधव
**| रायगड |**

**महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासह सुरक्षेचा गाजावाजा महिला व बाल विकास विभागामार्फत कायमच करण्यात आला आहे. प्रत्यक्षात मात्र त्याकडे दुलक्ष असल्याचे समोर आले आहे. रायगड जिल्ह्यामध्ये बाल विवाहाने थैमान घातले आहे. यामध्ये नऊ महिन्यांत १४७ अल्पवयीन मातांची प्रसूती झाल्याची माहिती समोर आली आहे. या आकडेवारीनुसार, रायगडला अल्पवयीन प्रसूतीचे संकट निर्माण झाले आहे. रायगडच्या आदिती तटकरे महिला व बाल विकास विभागाच्या मंत्री आहेत, त्यामुळे या गंभीर प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देतील का, असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.**

**नऊ महिन्यांत 147 मातांनी दिला अर्भकांना जन्म**

### बालविवाहप्रकरणी २५ गुन्हे

**रायगड पोलीस दलाच्या हद्दीतील १३ पोलीस ठाण्यांमध्ये बालविवाहप्रकरणी २५ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामध्ये तळा पोलीस ठाण्यात चार, रोहामध्ये तीन, कोलाड, वडखळ, पोयनाडमध्ये प्रत्येकी दोन, पाली, मांडवा सागरी, म्हसळा, रसायनी, मुरूड, अलिबाग, नागोठणे, महाडमध्ये प्रत्येकी एक असे गुन्हे दाखल झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.**



> **बालविवाहाचे प्रकरण आदिवासी दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात असल्याचे समोर आले आहे. शिक्षणाचा अभाव, सामाजिक भान या सर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांनी मिळून यावर अधिक चांगले काम केल्यास बालविवाह रोखण्यास मदत होईल.**
> – आंचल दलाल, जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड

इतर जिल्ह्यांच्या तुलनेने रायगड जिल्ह्याकडे एक सुशिक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो. कायद्याचे पालन करण्याबरोबर वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये रायगड जिल्ह्याचा सिंहाचा वाटा राहिला आहे. कायद्यानुसार मुलींसाठी किमान विवाह वय १८ वर्षे आहे. जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात विशेष करून आदिवासी भागांमध्ये १४ ते १७ वर्षे वयोगटातील मुलींचे लग्न लावले जात असल्याचे बोलले जात आहे. मुलींच्या सुरक्षेची भीती व्यक्त करण्याबरोबरच सामाजिक दबाव, अंधश्रद्धा आदी कारण दाखवून मुलींचे लग्न लावले जाते. त्यामुळे लहान वयातच माता बनण्याची वेळ या अल्पवयीन मुलींवर येते. बालविवाहामुळे अल्पवयीन मुलींवर शारीरिक, मानसिक व भावनिक परिणाम, आई व बाळाच्या आरोग्याला गंभीर धोका, शिक्षण अर्ध्यातून सोडण्याची वेळ, आयुष्यभर आर्थिक व सामाजिक दुर्बलतेचा धोका उद्भवतो. रायगड जिल्ह्यामध्ये जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत १४७ अल्पवयीन मुलींची (माता) प्रसूती झाली असल्याची माहिती उघड झाली आहे. ग्रामपातळीवर असलेल्या यंत्रणेकडून जागरुक व जबाबदारपणे अंमलबजावणी केली जात नाही. त्याचा परिणाम बालविवाह होण्याचे संकट वाढत आहे. त्यामुळे महिलांसाठी असलेल्या शासनाच्या योजना फक्त कागदावर अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा जोर धरत आहे.

**अल्पवयीन प्रसूती झालेल्या मातांवर दृष्टीक्षेप**

| महिना | प्रसूती संख्या |
|---|---|
| जानेवारी | २१ |
| फेब्रुवारी | १२ |
| मार्च | १५ |
| एप्रिल | १५ |
| मे | २१ |
| जून | १४ |
| जुलै | १२ |
| ऑगस्ट | १६ |
| सप्टेंबर | २१ |
| एकूण | १४७ |

## रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

### तोडगा न निघाल्याने आझाद मैदानावर आंदोलन सुरूच



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था नागोठणे आणि वंचित बहुजन माथाडी कामगार युनियन अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ७ ऑक्टोबरपासून आझाद मैदान, मुंबई येथे प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्तांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकऱ्या द्या, अन्यथा आमच्या जमिनी परत करा, असा एल्गार पुकारत रिलायन्स नागोठणे कंपनीविरोधात आंदोलन चांगलेच पेटले आहे.

जोपर्यंत रिलायन्स नागोठणे कंपनी प्रशासन नोकरीत रुजू होण्याचे कॉल लेटर देऊन आम्हाला कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेतले जात नाही, तोपर्यंत बेमुदत उपोषण सुरूच राहील, असा इशारा भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था नागोठणेचे अध्यक्ष गंगाराम मिनमिने व पदाधिकारी तसेच प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे. तोडगा न निघाल्याने पाच

पान २ वर

## कॉ. पानसरे हत्या; आरोपींना जामीन

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

कोल्हापूर येथील कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील संशयित डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झाला आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणी आजपर्यंत एकूण १२ संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ९ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता.

या प्रकरणातील डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना जामीन मंजूर झाला नव्हता. त्यामुळे ते तिघेही कळंबा कारागृहात होते. मंगळवारी तिघांच्याही जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापुरातील सर्किट बेंच इथं सुनावणी झाली. यामध्ये तिघांनाही न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यामुळे कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आजपर्यंतचे एकूण सर्वच १२ संशयितांना आता जामीन मंजूर झाला आहे.

पान २ वर

## रणसंग्राम शिगेला

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारी भाजपकडून पहिली उमेदवार यादी जाहीर करण्यात आली. भाजपच्या पहिल्या उमेदवार यादीत ७१ उमेदवारांचा समावेश आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान होणार आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान हे ६ नोव्हेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान हे ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
**आमच्या बहुमूल्य ग्राहकांच्या ध्यानार्थ**

आमच्या ग्राहकांना आमच्या सेवा एकत्रिकृत आणि सेवा सक्षम करण्यासाठी आमची **अलीबाग शाखा** खाली दिलेल्या तपशीलांनुसार चांगल्या पायाभूत सुविधांनी सुसज्ञ असलेल्या नवीन जागेत स्थलांतरित करण्याचे प्रस्ताव आहे.

| सध्याचा शाखेचा पत्ता | नवीन/प्रस्तावित परिसराचा पत्ता |
|---|---|
| **बँक ऑफ बडोदा** अलिबाग शाखा, प्लॉट क्रमांक ३०१, कृष्णा महाल बिल्डिंग, महेश टॉकीज जवळ, अलिबाग, जिल्हा- रायगड ४०२२०१ | **बँक ऑफ बडोदा,** अलिबाग शाखा, १२६५, सुखसागर भवन, आंबेडकर भवन समोर, अलिबाग, जिल्हा- रायगड ४०२२०१ |

ही शाखा **१७.११.२०२५** पासून नवीन/प्रस्तावित जागेत स्थलांतरित केली जाईल. ही शाखा नवीन जागेतून सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवसायाचे कामकाज करेल आणि सेवा देईल.

परिसर बदलल्याने ग्राहक सेवेवर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा व्यत्यय येणार नाही आणि तुम्ही समान पातळीची सेवा आणि ग्राहक सेवा आणि सर्वोच्च पातळीच्या ग्राहक समर्थनाची अपेक्षा करू शकता. कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, कृपया शाखांशी मेलद्वारे संपर्क साधा– **alibag@bankofbaroda.com**

या संदर्भात आपणास होणाऱ्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत आणि आम्ही तुम्हाला आमच्या सर्वोत्तम सेवा देण्याबद्दल पुन्हा एकदा आश्वासन देतो.

स्थान : नवी मुंबई
दिनांक : १५.१०.२०२५

क्षेत्रीय व्यवस्थापक
बँक ऑफ बडोदा (नवी मुंबई क्षेत्र)

# ड्रोन बंदी कागदावरच

## ● रेवदंडा किनाऱ्यावर गाड्या, दारू आणि सरकारी हप्तेखोरीला ऊत

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

रेवदंडा समुद्र किनाऱ्यावर बेधुंद पर्यटकांचा अराजक कारभार दिवसेंदिवस वाढू लागला आहे. सरकारी बंदी असतानाही किनाऱ्यावर ड्रोन उडवणे, चारचाकी वाहनं समुद्रावर घालून धिंगाणा घालणे, दारू पार्टीनंतर बेभान वेगात गाड्या चालवणे, अशा घटनांनी स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचा भडका उडाला आहे.



सरकारकडून किनाऱ्यांवर ड्रोन उडवण्यास सक्त मनाई असतानाही काही पर्यटक बिनधास्तपणे वेडिंग शूटिंगच्या नावाखाली ड्रोन उडवतात. हेच नव्हे तर, मोफत शूटिंग करणारे काहीजण स्थानिकांना उलट धाक दाखवतात, दमदाटी करतात. हे सर्व खुलेआम सुरू असून, स्थानिक प्रशासन व ग्रामपंचायत जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. समुद्रकिनारी दिवसा, रात्रीच्या वेळी दारू पार्टी, 'दम मारो दम'सारखी दृश्ये आणि गाड्यांसोबत समुद्रात घुसणारे पर्यटक या सगळ्यामुळे रेवदंडा किनारा 'हुल्लडबाजीचा अड्डा' बनू लागला आहे.

किनाऱ्यावर गाड्या गेल्या की 'खबरीलाल' नावाचा एकजण सरकारी बाबूंना फोन करून बोलावतो. त्यानंतर तोच सरकारी बाबू पर्यटकांकडून हप्ता वसूल करतो, आणि त्यातून खबरीलालला प्रत्येकी गाडीमागे ५०० रुपयांचे कमिशन दिले जाते, अशी जोरदार चर्चा रेवदंडा परिसरात सुरू आहे. स्थानिक नागरिकांचा सवाल असा आहे की, या गाड्यांना परमिशन देतो कोण? ड्रोन उडवायला बंदी असताना हे ड्रोन कसे उडतात? ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाचं डोळस नियंत्रण कुठं गेलं आहे?

सुट्टीसाठी आलेल्या कुटुंबियांना, लहान मुलांना, ज्येष्ठ नागरिकांना या हुल्लडबाजांमुळे धोका निर्माण होत आहे. म्हणूनच रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी स्वतः लक्ष घालून अशा पर्यटकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी रेवदंडा परिसरातील नागरिकांतून होत आहे. प्रशासनाने तातडीने बंदोबस्त केला नाही तर हा समुद्रकिनारा पर्यटकांसाठी नव्हे, गुन्हेगारांसाठी 'हॉटस्पॉट' बनेल, असे नागरिकांचं म्हणणं आहे.

# एमआयडीसीविरोधात महिला उतरल्या नदीच्या पात्रात

## ■ अन्यायकारक भूसंपादनाचा आरोप

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाकडून करण्यात आलेले भूसंपादन अन्यायकारक असल्याच्या भावनेने तळोजा परिसरातील शेतकऱ्यांनी उपोषण आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनाच्या दहाव्या दिवशी आंदोलन अधिक तीव्र करण्यात आले आहे. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी पाण्यात उभे राहून आपला रोष व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. यातील काही महिलांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळाली आहे.




शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे सरकारचे आणि प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, जमिनी अधिग्रहणाच्या मोबदल्यात योग्य दर न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे त्यांच्या हक्कांसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे. दरम्यान, उपोषणाला स्थानिक नागरिक व विविध सामाजिक संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. दररोज वाढत्या संतापामुळे आंदोलनस्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून मात्र अद्याप कोणताही ठोस निर्णय किंवा चर्चेचा प्रयत्न करण्यात आलेला नाही. शेतकऱ्यांच्या या जिद्दी लढ्याला आता महिलांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. सरकारने तात्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा पाठिंबा

। उरण । प्रतिनिधी ।

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कासाठी राज्यभर ठिकठिकाणी होणाऱ्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन लढा उभारला जात आहे. त्याचाच भाग म्हणून दि.०२ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने काढण्यात आलेल्या ओबीसीवर अन्याय करणारा शासन निर्णयाविरोधात दि. ८ सप्टेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयात शिवा संघटनेच्या वतीने पहिली याचिका दाखल केली आहे. एवढेच नाहीतर ज्या आझाद मैदानावर २ सप्टेंबरचा जीआर देण्यात आला, त्याच आझाद मैदानावर अन्याय करणारा जीआर रद्द करण्यासाठी शिवा संघटनेच्यावतीने दि. ७ ऑक्टोबर रोजी प्रचंड धरणे आंदोलन करण्यात आले. याच धरणे आंदोलनाच्या व्यासपीठावरून ओबीसीचे संघर्ष योध्दे व मंत्री छगन भुजबळ यांनी पावसामुळे रद्द झालेल्या बीड येथील ओबीसीच्या महाएल्गार सभेची घोषणा केली. दि. १७ ऑक्टोबरला ही महाएल्गार सभा ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली घेण्याचे जाहीर केले आहे. या महाएल्गार सभेला शिवा संघटनेसह मराठवाड्यातील संपूर्ण ओबीसी समाजाचा जाहीर पाठिंबा आहे.



तरी मराठवाड्यातील शिवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वीरशैव लिंगायत समाजबांधवासह संपूर्ण ओबीसी समाजबांधवानी शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.

# पनवेल परिसरात भातकापणीला सुरुवात

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल परिसरातील असलेल्या शेतजमिनीवर यंदा भातपीक कापणी योग्य तयार झाले असून, कापणीला सुरुवात झाली आहे. या कापणीतून हजारो हातांना आता महिनाभर काम मिळणार आहे. विशेष म्हणजे, आदिवासी वाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे दालन खुले झाले आहे.

वाढत्या औद्योगिकीरणासह उत्पादन कमी येत असल्याने भात शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस भातपिकांचे क्षेत्र कमी होऊ लागले आहे. खर्च अधिक आणि उत्पन्न कमी या नकारात्मक विचारामुळे अनेकांनी शेती करण्याकडे दुर्लक्ष करून मुंबई, पुण्याकडे नोकरी करण्यावर भर दिला आहे. तर, काही ठिकाणी औद्योगिकीकरणामुळे जमीन संपादन प्रक्रिया वाढू लागली आहे. अनेकांच्या पिकत्या जमिनी प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आल्या असून, काही ठिकाणी त्या घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतीचे क्षेत्र घटले आहे. दहा वर्षांपूर्वी १ लाख २४ हजार हेक्टर क्षेत्र होते. मात्र, दोन वर्षांपूर्वी हेच क्षेत्र ९४ हजार हेक्टर इतके होते. यावर्षी या क्षेत्रात १० हजार हेक्टरने घट झाली आहे. त्यामुळे यावर्षी जिल्ह्यामध्ये ८४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात पिकांची लागवड करण्यात आली होती. त्यात कोलम, सुवर्णा, रत्ना अशा अनेक पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. आता पावसाचा हंगाम संपला असून भात शेती बहरू लागली आहे. कापणीयोग्य पीक झाल्याने शेतकऱ्यांनी गेल्या चार दिवसांपासून कापणीला सुरुवात केली आहे.

दुपारी ऊन लागत असल्याने पहाटेपासूनच भात कापणीला सुरुवात केली जात आहे. शेतकरी कापणीच्या कामाला लागला आहे. दिवाळीपूर्वी ३० टक्क्यांहून अधिक क्षेत्रातील भात कापणी पूर्ण होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या भात कापणीतून ग्रामीण भागातील विशेष म्हणजे आदिवासी वाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. ३०० रुपयांपासून कामगारांना मजुरी दिली जात आहे.

# ज्येष्ठांनी घेतली सदिच्छा भेट



। उरण । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ नागरिक मंडळ मुलेखंड, तेलीपाडा, कुंभार वाडा, कोळीवाडा आणि परिसर मंडळातील सदस्यांनी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांची सदिच्छा भेट घेतली.

ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही प्रकारची मदत पाहिजे असल्यास आम्ही मदत करण्यास तयार आहोत. ज्येष्ठ नागरिकांची समाजाला अत्यंत गरज आहे. तुम्हाला नेहमीच सहकार्य मिळेल. कुणीही त्रास देत असल्यास आम्हाला सांगा, आम्ही योग्य निर्णय घेऊन न्याय देण्याचे काम करू, तुम्ही आम्हाला सहकार्य करा, आम्ही तुम्हाला सहकार्य करू, असे उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी प्रतिपादन केले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कुंभार वाडा, कोळीवाडा आणि परिसरचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सेक्रेटरी परशुराम पाटील, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सदस्य हरिचंद्र म्हात्रे, समाजसेवक बसूशेठ बडीगर, ललित कुंभार, उद्योगपती सुरेश मांडेलकर, सुनील पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

भैरवदेव विद्यालय, रिटघर, पनवेल तालुका ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या वतीने ११वी व १२ वी विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांसाठी क्राईम, गुन्हे, सायबर सुरक्षेततेबद्दल हेल्प नंबर १९३०, पोलीस हेल्प नंबर ११२, मोबाईलचा दुरुपयोग, याबद्दल एक मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आला होता. या मार्गदर्शन शिबिरासाठी, पनवेल तालुका सहायक पोलीस निरीक्षक गौरव इंगोले यांनी महिला, भगिनी व पालकांसाठी व विद्यार्थी मित्रासाठी योग्य मार्गदर्शन दिले. यावेळी सरपंच सुभाष भोपी यांनी यावेळीदेखील मार्गदर्शन केले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी व स्कूल कमिटी सदस्य, रिटघर पोलीस पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

# जेएनपीए करणार वाढवणचा विकास



। चिरनेर । प्रतिनिधी ।

मंत्रिमंडळाच्या मंजुरीनुसार जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) पालघर महाराष्ट्रातील पालघर, जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात वाढवण बंदर विकसित करत आहे. भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी बंदर पायाभूत सुविधांपैकी एक असलेल्या या प्रकल्पाला काही स्थानिक संघटनांनी माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या संघटनांनी डहाणू तालुक्यातील वाढवण येथे प्रमुख बंदरांच्या स्थापनेची संबंधित कोणत्याही कामाला स्थगिती देण्याच्या आदेशाच्या स्वरूपात अंतरीम दिलासा मागितला होता.

२८ फेब्रुवारी २०२५ च्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयाने जेएनपीएने सादर केलेल्या वाढवण बंदर प्रकल्पाचा विकास वेळापत्रकाची नोंद घेत याचिकाकर्त्यांनी मागितलेला अंतरीम दिलासा देण्याची विनंती फेटाळून लावली. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, अधिग्रहण कार्यवाही आणि इतर संबंधित पावले प्रलंबित याचिकांमध्ये पुढील आदेशांच्या अधीन राहतील. सद्यःस्थितीत वाढवण बंदराच्या विकास कामांवर कोणतीही स्थगिती नाही. आणि जेएनपीएने सर्वोच्च न्यायालयासमोर सादर केलेल्या मंजूर आराखड्यानुसार प्रकल्पाची अंमलबजावणी पुढे नेत आहे.

याबाबत जेएनपीएने आणि वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपी एल) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेश शरद वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा भारताचा सागरी दृष्टिकोनावर आणि विधी संगत प्रक्रियेवरील विश्वास दृढ करणारा आहे. वाढवण बंदर हा केवळ पायाभूत प्रकल्प नाही. तो प्रगतीचे प्रतीक आहे. जो भारताच्या पश्चिम किनाऱ्याला जागतिक व्यापाराच्या केंद्राशी जोडणार असल्याचे सांगितले.

पान १ वरून

## पीएनपी नाट्यगृहात होणार संविधानाचा जागर

वर्षानिमित्त कलाकारांना व्यासपीठ मिळणार आहे. पी.एन.पी. नाट्यगृह अलिबाग या ठिकाणी दि. १६ व १७ ऑक्टोबर रोजी दोन दिवस सायंकाळी ६.३० ते १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. दि.१६ ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रग्रंथ-आधारस्तंभ लोकशाहीचा' हे प्रसाद थोरवे आणि अभिराम भडकमकर लिखित, कुमार सोहोनी दिग्दर्शित दोन अंकी नाटक सादर केले जाणार आहे. तर, दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० ते १० या वेळामध्ये लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत 'गौरवगाथा संविधानाची' हा कार्यक्रम 'एकच राजा येथे जन्मला' फेम गायक रोहित पाटील, योगेश काळबेरे, 'अलिबागचा कुलाबा किल्ला फेम' गायिका रेश्मा पाटील, ज्ञानराज पाटील, प्रतीक नाईक, आशुतोष पोटे, राजेंद्र जाधव आणि सहकारी यांनी सादर केलेल्या भव्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. रसिक प्रेक्षकांनी या सर्व कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय विभीषण चवरे यांनी केली आहे.

## महाविकास आघाडीची वज्रमूठ

सुरु झाल्या आहेत. निवडणूकांपूर्वी विशेष मोहीम राबवून मतदारयाद्यांचे शुद्धीकरण करण्याबरोबरच त्या निर्दोष करण्यात याव्यात, अशी मागणी महाविकास आघाडीच्यावतीने निवडणूक अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संबंधित प्रस्ताव भारत निवडणूक आयोगाला पाठविण्यात येईल, असे आश्वासन राज्याच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले.

## रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

दिवसांनंतरही आंदोलक भूमिकेवर ठाम असून, न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे. कारखान्यासाठी जमीन भूसंपादन करताना स्थानिकांना भूमिपुत्रांना नोकरीचे आश्वासन दिले होते, आणि त्यातूनच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दिले होते, ज्या भूमीपुत्रांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दिले जाते, त्याला कायमस्वरूपी नोकरी देणे गरजेचे असताना ठेकेदारी पद्धतीने नोकरी देण्याचा अट्टाहास का? असा जीआर असेल तर जिल्हा प्रशासनाने दाखवावा, अशी मागणी संजय कुथे यांनी केली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर कारखाना दिमाखात उभा आहे, कारखाना नफ्यात आहे, अनेकजण निवृत्त होत आहेत, आमच्याकडे गुणवत्ताधारक व उच्चशिक्षित तरुण आहेत. कौशल्य व गुणवत्तेच्या आधारावर कायमस्वरूपी नोकऱ्या देणे शक्य होईल. असे असताना प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्त भूमीपुत्र वाऱ्यावर का, असा सवाल प्रकल्पग्रस्त व आंदोलकांनी उपस्थित केला आहे.

मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांची बैठक दिनांक २४/६/२०२५ रोजी मंत्रालय कक्ष ६ मुंबई येथे बैठक झाली. त्या बैठकीत दोन महिन्यांत कायमस्वरूपी नोकरीत ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारकांना रिलायन्स कंपनीत घेण्याचे निर्देश रिलायन्स कंपनी अधिकारी व जिल्हाधिकारी रायगड यांना देण्यात आले. परंतु, शासनाच्या आदेशाकडे कंपनीचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्त करीत आहेत. त्यामुळे ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी मिळावी या मागणीसाठी पुन्हा संविधानिक मार्गाने आंदोलनाचा पवित्रा घेतला असल्याचे प्रकल्पग्रस्तांचे नेते गंगाराम मिनमीने म्हणाले.

## खैर तस्कराला ठोकल्या बेड्या

केल्याबाबत संदीप उत्तम माने, वाहन चालक-मालक, रा. कारेगव्हाण, ता. बीड, जि. बीड या आरोपीस अटक केली आहे. दरम्यान, वाहनासह अंदाजे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत उपवनसंरक्षक रोहा व सहाय्यक वन संरक्षक रोहा यांच्या मार्गदर्शनाने वनक्षेत्रपाल महाड व वनपरिक्षेत्राधिकारी आशिष पाटील यांनी पुढील कारवाई केली. याबाबतचा तपास चालू केले असल्याचे सांगितले.

## आजपासून वादळी पावसाचा इशारा

भातपिके पाण्याखाली गेली. त्यानंतर पावसाने ब्रेक घेतल्याने पाऊस गेला, असे अनेकांना वाटले. गेल्या काही दिवसांपासून हवामान पूर्णपणे कोरडे असून, नैऋत्य मान्सूनने निरोप घेतल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, १५ ऑक्टोबरपासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. शनिवारी १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपारनंतरचा वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सध्याच्या अंदाजानुसार, वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकते. अनेक भागांमध्ये ढगाळ हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील. खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## कॉ. पानसरे हत्या; आरोपींना जामीन

२० फेब्रुवारी २०१५ रोजी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांची कोल्हापुरात राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्याच दरम्यान अंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि दक्षिणेतील विचारवंत एम.एम. कलबुर्गी, ज्येष्ठ पत्रकार गौरी लंकेश यांच्याही हत्येशी संबंध होता. मात्र, महाराष्ट्रातील तपास यंत्रणांना या हत्येचा तपास सुरु असताना यश आलेलं नव्हतं. जेव्हा गौरी लंकेश हत्या प्रकरणात अटक झाल्या. त्यानंतर गोविंद पानसरे हत्या प्रकरणात तपास यंत्रणांना यश मिळण्यास सुरुवात झाली होती. मात्र, अखेर या प्रकरणातील सर्व संशयितांना मंगळवारी जमीन मंजूर झाला आहे.

## स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मार्ग मोकळा

विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी समाजाभिमुख कार्यकर्त्याला मिळेल, असा विश्वासदेखील बावनकुळे यांनी व्यक्त केला. दरम्यान, सरकारने हा निर्णय लागू केल्यास नगरपालिका, महापालिका यांप्रमाणे जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

दरम्यान, राज्यात एकीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून, महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र येऊन निवडणूक लढल्यास अनेक इच्छुकांना संधी मिळणार नाही. त्यातच पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते आणि पात्र उमेदवार संधी मिळण्यापासून वंचित राहू नये म्हणून ही सोय करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी नगरपालिका, महापालिकांमध्ये संख्याबळाच्या आधारे स्वीकृत सदस्य घेतले जात आहेत. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्यांची नेमणूक झाल्यास अनेकांना संधी मिळू शकते.

## लैंगिक छळाला कंटाळून आत्महत्या

कारण सांगितले आहे. 'मी प्रेमभंग, कर्ज किंवा इतर कुठल्याही कारणामुळे हा टोकाचा निर्णय घेतलेला नाही. जबर मानसिक आघात आणि नैराश्य हे यामागचे कारण आहे. माझी अशी अवस्था होण्यास आरएसएस ही संघटना आणि त्यातील एक व्यक्ती आहे. लहानपणी संघाच्या शिबिरांमध्ये माझा त्या माणसाने व इतर अनेक स्वयंसेवकांनी सतत लैंगिक छळ केला. माझ्या शरीराचा एखाद्या खेळण्यासारखा वापर केला. माझ्यासाठी तो आयुष्यभराचा धक्का होता. त्यातून मी कधीच सावरलो नाही,' असे आनंदने म्हटले आहे. 'माझ्याप्रमाणे इतर अनेक मुलांना यातून जावे लागले आहे. त्यामुळे या संघटनेच्या लोकांना जवळ करू नका,' असा इशाराही त्याने दिला आहे.

**प्रियंका गांधी यांची चौकशीची मागणी**

आनंदू अजि याने केलेल्या आरोपांची सखोल चौकशी करण्याची मागणी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केली आहे. 'आनंदू याने वारंवार आरएसएसचे नाव घेऊन आरोप केला आहे. त्याचे म्हणणे खरे असेल तर हे भयानक आहे. देशभरात लाखो मुले आणि तरुण आरएसएसच्या शिबिरांमध्ये जातात. त्यामुळे आरएसएसच्या नेतृत्वाने यावर तात्काळ खुलासा करावा व सर्व संबंधितांवर कारवाई करावी,' अशी मागणी प्रियंका यांनी 'एक्स' पोस्टद्वारे केली आहे.

## सोन्या-चांदीला पुन्हा झळाली

सराफा बाजारातही दिसून येत आहे. जागतिक अस्थिर परिस्थिती आणि शेअर बाजारातील दबावामुळे अनेक गुतंवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्या-चांदीकडे वळत आहेत. त्यामुळे मागणी वाढल्याने वायदे बाजारात सोन्याचे दर सातत्याने वाढत आहे. त्याचा परिणाम सराफा बाजारावरही दिसत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे जागतिक अस्थिरता निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात सोन्या-चांदीतील तेजी कायम राहण्याचा अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला आहे. सराफ बाजारातही सोन्या आणि चांदीच्या दराने आजपर्यंतचा उच्चांक गाठला आहे. सलग दुसऱ्या दिवशी सोन्याच्या आणि चांदीच्या दरामध्ये विक्रमी वाढ झाली आहे. चांदीने एका दिवसात तब्बल १० हजारांची वाढ नोंदवली आहे. तर सोन्याच्या दरात १८०० रुपयांनी वाढ झाली आहे. सोन्याचे दर जीएसटी सह एक लाख ३० हजार रुपयांवर पोहोचले आहेत. तर बाजारात चांदीची मागणी वाढत आहे. मात्र, त्याप्रमाणात पुरवठा नसल्याने चांदीसाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत. तसे काही ठिकाणी आगाऊ पैसेही घेतले जात आहेत. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह १ लाख ९४ हजार रुपयांवर पोहोचले असून चांदीच्या दराने नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. दिवाळीच्या तोंडावर चांदी दोन लाख रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे.

# दिव्यांगांना साथ देणे हे कर्तव्य : घरत



। उरण । प्रतिनिधी ।

काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांचा दातृत्वाचा महिमा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. कैलास मानसरोवर यात्रेच्या निमित्ताने नुकतेच त्यांनी नेपाळमधील एका दाम्पत्याला घर बांधून देऊन त्याची साक्ष दिली आहे. दिव्यांगांसाठी तर ते कायमच पाठीराखे आहेत.

प्रेषित विनिता बर्फे हा विद्यार्थी उलवे नोडमध्ये राहात असून, नववीमध्ये शिकत आहे. तो १०० टक्के दृष्टिहीन आहे. त्याला पुढील शिक्षण सुकर व्हावे, म्हणून विनिता बर्फे यांनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्याकडे ब्रेल लिपीतील लॅपटॉपची मागणी केली होती. महेंद्र घरत आणि शुभांगी घरत यांनी क्षणाचाही विलंब न लावता प्रेषितला नुकताच अत्याधुनिक असा ब्रेललिपीतील लॅपटॉप भेट म्हणून दिला. त्यामुळे त्याचे आता शिक्षण अधिक सुकर होणार आहे. त्यामुळे महेंद्र घरत दाम्पत्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरले आहेत.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "गरजवंताला मदत करणे हे माझ्या नसानसांत भिनले आहे. विशेषतः दिव्यांगांबाबत मी अधिक सकारात्मक विचार करतो. कारण दिव्यांगांचे पालनपोषण करताना पालकांची ससेहोलपट होते. दिव्यांगाच्या जन्मापासूनच त्याच्या आई-वडिलांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते, तरीही ते हार मानत नाहीत. प्रेषित हा गरजू आणि होतकरू विद्यार्थी आहे. तो शंभर ट्क्के दृष्टिहीन आहे. त्यामुळे त्याची शिक्षणातील अडचण मी समजून घेऊन त्याला आता ब्रेललिपीतील लॅपटॉपरूपी दृष्टी दिली आहे. मी माझे कर्तव्य केले आहे. यापूर्वीही मी अनेक दिव्यांगांना सहकार्य केले आहे."

यावेळी लहानपणापासून दृष्टिहीन असलेला प्रेषित म्हणाला, "माझ्या शिक्षणातील अडचण महेंद्रशेठ घरत साहेब यांनी तातडीने सोडविली आहे. त्यांनी मला शब्द दिला होता; परंतु आज त्यांनी तो पूर्ण करून दाखवला. हे उपकार मी कधीही विसरणार नाही. महेंद्र घरत आणि शुभांगीताई यांचा मी कायमचाच ऋणी राहीन. त्यांचे मनापासून आभार."

# घारापुरी बेट अंधारात

## ग्रामस्थ-व्यावसायिक हैराण; महावितरणाचा बेजबाबदार कारभार

| उरण | प्रतिनिधी |

**जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ ‘घारापुरी’ बेट आज पुन्हा अंधारात बुडाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या निष्क्रिय आणि बेजबाबदार कारभारामुळे गेल्या काही महिन्यांपासून घारापुरी बेटावरील वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. यामुळे ग्रामस्थ आणि व्यावसायिक अक्षरशः हैराण झाले आहेत. ग्रामपंचायतीने २०२१ पासून वारंवार पत्रव्यवहार करूनही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कानाडोळाच केल्याने ग्रामपंचायतीचा संयम सुटला असून संताप उफाळला आहे.**



घारापुरी हे जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ असून चारही बाजूंनी समुद्राने वेढलेले बेट आहे. स्वातंत्र्यानंतर दशके या बेटावर वीज नव्हती. अखेर २०१८ मध्ये समुद्रातून सबमरीन केबल टाकून बेटावर कायमस्वरूपी वीज पुरवठा सुरू करण्यात आला आणि घारापुरीच्या सौंदर्यात भर पडली. मात्र, आज सहा वर्षांनंतर या विजेचा उजेडच मंदावला आहे. वीज वारंवार खंडित होत असल्याने बेटावरील नागरिक, व्यापारी आणि पर्यटक त्रस्त झाले आहेत. मोटार पंप बंद पडल्यामुळे ग्रामपंचायतीला ग्रामस्थांना पिण्याचे पाणी देणेही शक्य होत नाही. वीज खंडित होण्याबाबत ना ग्रामपंचायतीला सूचना दिल्या जातात, ना ग्राहकांना माहिती दिली जाते.

घारापुरी येथे महावितरणचे एकही अधिकारी किंवा कर्मचारी कायमस्वरूपी राहत नसल्याने वीज गेली की ग्रामस्थांना ग्रामपंचायतीकडे धाव घ्यावी लागते. ग्रामस्थांना विचारायला कोणी नसते, वीज दुरुस्ती करायला कोणी नसते, आणि महावितरण कार्यालयातून मिळते ती केवळ उद्या-परवाची आश्वासने! त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, आता पुरे झाले, वीज नसेल तर आंदोलन होईल, अशा शब्दांत संताप व्यक्त केला जात आहे.

ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार, सबमरीन केबलपैकी काही भाग दोन वर्षांपूर्वी दुरुस्त करण्यात आला होता, परंतु त्यानंतरपासूनच विजेचा पुरवठा सतत खंडित होतो आहे. या समस्येबाबत ग्रामपंचायतीच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या पनवेल कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन अनेक वेळा तक्रारी केल्या, मात्र लवकरच प्रश्नमार्गी लावू या आश्वासनावरच प्रकरण अडकले आहे. दोन ते तीन वर्षे उलटून गेली, तरी काहीही सुधारणा झालेली नाही.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, न्हावा टी. एस. रहमान येथून येणाऱ्या ३३ केव्ही क्षमतेच्या वीजवाहिनी ऐवजी आता घारापुरीला केवळ २२ केव्ही क्षमतेची केबल जोडण्यात आल्याचे समजते. त्यामुळे वीज पुरवठा अधिकच अस्थिर झाला असून वारंवार खंडित होतो आहे. हे बदल कोणाच्या आदेशाने व कोणाच्या मंजुरीने करण्यात आले, याबाबत ग्रामपंचायतीने महावितरणकडे स्पष्टीकरण मागितले आहे.

घारापुरीचे उपसरपंच बळीराम ठाकुर व सरपंच मीना भोईर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घारापुरीला मिळालेली वीज कायमस्वरूपी राहावी हीच ग्रामस्थांची अपेक्षा होती. मात्र, महावितरण अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे आज आम्हाला पुन्हा अंधारात जगावे लागत आहे. वीज प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर ग्रामस्थांचा रोष आंदोलनात परिवर्तित होईल. घारापुरीकरांचा रोष आता प्रखर होत असून, महावितरणने त्वरित अधिकारी नेमून केबल दुरुस्तीचे काम हाती घेतले नाही, तर या बेटावर संतापाचा स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> **वीज पुरवठा सुरू झाल्यानंतर घारापुरीच्या विकासाला नवी गती मिळाली होती. पर्यटक, स्थानिक व्यवसाय, पाणीपुरवठा आणि सुरक्षेची साधने या सर्व गोष्टी विजेवरच अवलंबून आहेत. पण महावितरणच्या निष्क्रिय कारभारामुळे हा सर्व विकास पुन्हा मागे खेचला जात आहे. वीज नसली तरी आम्ही झुकणार नाही. आमच्या बेटाचा प्रकाश आम्ही परत मिळवणारच.**
> **– घारापुरी ग्रामस्थ**



# शेकापकडून मदतीचा हात

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

तळागाळातील घटकाचा विकास साधण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष कायमच प्रयत्नशील राहिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून केजमधील दिवंगत अशोक सौदागर यांच्या कुटुंबाला शेकापकडून मदतीचा हात देण्यात आला. शेकापकडून केलेल्या मदतीचा माणुसकीचे दर्शन झाले.

कोरोनाकाळासह वेगवेगळ्या आपत्तीच्या काळात शेतकरी कामगार पक्षाने गरजूंना मदत करून त्यांना उभारी देण्याचा प्रयत्न केला आहे. शेकापच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबवून शेवटच्या घटकांचा आर्थिक, सामाजिक शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

केज परिसरातील अशोक सौदागर यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटूंबाला मदतीचा हात केजमधील शेतकरी कामगार पक्ष, क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आला.


शेकाप महिला आघाडीच्या राणी क्षीरसागर, शिवश्री जनार्दन सोनवणे यांच्या हस्ते आर्थिक मदत देऊन त्यांना बळ देण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेकापचे मोहन गुंड, अशोक रोडे, तात्या राडे, शाम चिंचोलकर बबलु रोडे शुभम निगुळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल ग्रामीण भागात वीज पुरवठा खंडित

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास ४० हुन अधिक गावांचा विद्युत पुरवठा तब्बल २१ तासानंतर सुरळीत करण्यात आला. मध्यरात्री वीज गायब झाल्याने अनेकांना भयंकर त्रास सहन करावा लागला. विद्युत अधिकार्यांना भ्रमणध्वनीवर फोन केला असता त्यांचे फोन फॉरवर्ड केले असल्याचे वीज ग्राहकांनी सांगितले. सात ऑक्टोबर रोजी मध्यरात्री बारा वाजता खंडित झालेला विद्युत पुरवठा ८ ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या दरम्यान सुरळीत करण्यात आला. तब्बल २१ तास वीज नसल्याने अनेकांचे पाण्याविना हाल झाले. पाणी नसल्याने काहींना तर अंघोळ देखील करता आली नाही. तर कित्येकांना पाण्याचे जार विकत घ्यावे लागले. मध्यरात्री वीज गायब झाल्याने अनेकांची झोपमोड झाली. त्यातच मच्छरानी देखील नागरिकांना हैराण केले. काही वेळानंतर विज येईल या भाबड्या आशेत नागरिक होते. मात्र हजारो वीज ग्राहकांनी तब्बल २१ तासानंतर विज आल्याने सुटकेचा निःश्वास सोडला. ऑक्टोबर हिट असल्याने रात्री आणि दिवसा प्रचंड उष्मा जाणवत होता. त्यातच शाळेतील विद्यार्थ्यांना देखील या विजेचा फटका बसला. फॅन नसल्याने वर्गात उष्णता जाणवत होती.

## निवडक




### वीज चोरांवर महावितरणकडून कारवाई

**नेरळ :** नेरळमधील विद्युत चोरी संदर्भात चाळीमध्ये वीज चोरी होत होती. विद्युत चोरीला जात असल्याची माहिती पुढे आल्यानंतर त्यानंतर तत्काळ महावितरणकडून कारवाई करण्यात आली. दरम्यान, महावितरणाचे कर्मचाऱ्यांनी तत्काळ चोरीला जात असलेली विद्युत थांबवली असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून विद्युत पोळ वरून चोरून घेण्यात आलेली लाईन काढून टाकण्यात आली आहे. नेरळ परिसरामध्ये महावितरणाची कृपादृष्टी चाल धारकांवरती होताना दिसून येत होती. विद्युत मीटर नसताना देखील विद्युत पोळ वरून आलेल्या वायरला डायरेक्ट कनेक्शन करून विद्युत चोरीली जात असताना महावितरणाचे दुर्लक्ष होत होते. नेरळमधील मोहाचीवाडी जवळ असलेली कोमलवाडी येथे श्री साई परफेक्ट होम इथे खूप मोठ्या प्रमाणात चाळी उभारण्यात आलेल्या आहेत. गेली सात-आठ वर्ष ही लोक चोरून विजेचा वापर करत होते. त्या ठिकाणी महावितरणाचे कर्मचारी अनेक वेळा जात होते.परंतु त्यांच्याकडून त्या चाळधारकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करत नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे होते. या चाळीसाठी लागणाऱ्या पाण्याची टाकी देखील विद्युत चोरून मोटर पंपाने भरली जात होती. हा सर्व महावितरणच्या नजरेखाली आणून देताच महावितरणाचे वरिष्ठ अधिकारी चंद्रकांत केंद्रे यांनी संबंधितांवर कारवाई करून तत्काळ चोरीस जात असलेली विद्युत खंडित करण्याचे आदेश स्थानिक वायरमन यांना देण्यात आले.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल :** श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे, विद्यार्थी वाहक संस्था, नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना, पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने यॅलेसेमिया रुग्णांच्या मदतीकरिता एमजीएम हॉस्पिटल कामोठे यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे व आरोग्य शिबिराचे आयोजन झुलेलाल मंदिर पनवेल येथे करण्यात आले होते.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन ॲड. मनोहर सचदेव, ॲड. अमोल साखरे, डॉ रमेश पटेल, पांडुरंग हुमणे यांच्या उपस्थितीत झाले या रक्तदान शिबिरात एकूण १०७ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. यावेळी अवयव दान या विषयावर इंदुमती ठक्कर यांनी समुपदेश केले. यावेळी ईसीजीची मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबिर यशस्वी करण्याकरिता मुरलीधर ढाके, वर्षा ढाके, संगीता साखरे, उज्वला भिसे, सचिन भिसे, भूषण चोणकर, किसन रौंदळ, यांनी विशेष परिश्रम घेतले.



### परिवर्तन प्रतिष्ठानतर्फे फराळ वाटप

**उरण :** उरण तालुक्यातील जि. प. शाळा रानसई येथे परिवर्तन प्रतिष्ठान वतीने सोमवार (दि.१३) रोजी सर्व विद्यार्थाना शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. एक पाऊल समाजाच्या हितासाठी या उद्देशाने एकाच ठिकाणी गेली पाच वर्षापासून सदरचे उपक्रम राबवित आहे असे परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रीतम पाटिल यांनी सांगितले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मनिष पांडुरंग पाटील होते. याप्रसंगी परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रीतम पाटील, उमेश म्हात्रे, अक्षय पाटील, प्रणित वीरकुद, हितेंद्र मोहिते, राजा वाघेरी, परेश म्हात्रे, मंदार चव्हाण, संतोष कुथे, क्रिश बंडा, नचिकेत पवार, प्रथमेश पाटील, दीक्षा पटेल, युवराज कुथे परिवर्तन प्रतिष्ठान पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# पोलिसांनी आवळल्या चोरांच्या मुसक्या

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी पाताळगंगा औद्यौगिक परिसरातील वानिवली येथील वंडरशेफ होम अप्लायन्सेस प्रा. लि. कंपनीतील कामगारांचे एकुण १५ अँड्राईड मोबाईल कंपनीतील सिक्युरिटी केबीनचा दरवाजा उघडून घरफोडी करुन चोरट्यांनी पळविले. सदर घटनेची रसायनी पोलिसांना खबर मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर हे पथकासह घटनास्थळी पोहचले. त्यानंतर फिर्यादी यांचे खबरेवरुन रसायनी पोलीसांनी गुन्हा दाखल केला.

सदर गुन्ह्याचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पडताळणी केली असता तीन अनोळखी इसम हे कंपनीमध्ये प्रवेश करुन सिक्युरिटी केबीनचा दरवाजा ढकलुन आत घुसून कामगारांचे मोबाईल चोरी करीत असताना दिसून आले. सदर इसम हे कॉन्ट्रॅक्टरकडे काम करत असल्याची माहिती मिळाली. या इसमांना ताब्यात घेणेकरीता ते राहत असलेल्या वानिवली चाळीमध्ये पोलीस पथक पोहचले असता ते रात्रीच फरार झाले होते. ते मुळ गावी उत्तरप्रदेश येथे जाण्याचा तयारीत असल्याची माहिती मिळाली. यावेळी मुंबई येथे पथक रवाना केले. पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी तांत्रीक पुराव्यांच्या विश्लेषण करुन पोलीस पथकास मार्गदर्शन करुन तसेच पोलीसांनी गोपनिय बातमीचे आधारीत संपुर्ण कौशल्यपुर्ण तपासा वरून सदर तिन्ही आरोपीना डोंगरी मुंबई येथून सापळा रचून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीना अटक करुन चोरी केलेले सर्व १५ मोबाईल त्यांच्याकडून हस्तगत केले. सदर गुन्ह्याचा वपोनि संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेमंत कोकाटे करीत आहेत.

### जनतेला अवाहन

**जनतेने आपल्या मौल्यवान वस्तु सुरक्षित ठेवाव्यात तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या कार्यालयाबाहेर अथवा घराबाहेर किंवा आजुबाजुच्या परिसरात शक्य असल्यास जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत. जेणे करुन पोलीसांना सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीतांची ओळख पटवून त्यांचा शोध घेण्यास मदत होईल. अथवा डायल ११२ वर संपर्क करुन माहिती द्यावी.**
**– जनसंपर्क अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड अलिबाग**

## घारापुरीत आर्थिक बचत गट सुरू

उरण : घारापुरी हे फक्त ऐतिहासिक बेट नाही, तर आता स्वावलंबनाचं बेट बनत चाललंय. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत (दि.१४) ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात घारापुरी येथील महिलांच्या बचतगटांसाठी बचतगट अधिकारी नेमाडे यांनी महिलांना मार्गदर्शन करून स्वावलंबनाचा नवा मंत्र दिला. घारापुरी हे बेट असल्याने रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. पण या बेटावरच्या महिला हार मानायला तयार नाहीत. घर, संसार, समुद्र आणि संघर्ष यांच्या संगमावर उभ्या राहून त्यांनी आता बचतगटांच्या माध्यमातून स्वतःचा आर्थिक कणा मजबूत करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी त्यांनी आर्थिक बचत गट सुरू केला आहे.



## घाट रस्त्यातील खड्डे भरण्यास सुरुवात

| नेरळ | प्रतिनिधी |

पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानला जाण्यासाठी असलेल्या एकमेव रस्त्यावर मागील पाच महिने सुरु असलेल्या पावसाने दुरवस्था केली होती.या रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी वाहून नेणारी गटारे बंद झाली आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी हे डांबरी रस्त्याने वाहत जात असते आणि त्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली होती. दरम्यान, नेरळ माथेरान घाटरस्त्याची दुरुस्ती रस्त्यावरील खड्डे डांबर टाकून भरले जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून रस्त्यावरील खड्डे भरण्याची कामे सुरु असून आगामी काही दिवसांनी माथेरान येथील पर्यटन हंगाम सुरु होत असल्याने रस्त्याच्या दुरुस्तीबद्दल नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेकडून बांधकाम खात्याचे आभार मानले जात आहेत.

# कळंबोलीत पाण्यासाठी मोर्चा

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोली तसेच नावडे वसाहतीमधील नागरिक सद्या तीव्र पाणी टंचाई चा सामना करत आहेत. यामुळे त्रस्त नागरिकांनी कळंबोली येथिल सिडको कार्यालय गाठले असून अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले आहे. सणासुदीच्या काळात देखील पाण्याचा थेंब थेंब मिळत नसल्याने नागरिक संतप्त झाले असून, पाणी द्या, जगू द्या अशा घोषणा देत त्यांनी सिडको प्रशासनाचे लक्ष वेधले. गेल्या काही महिन्यांपासून या भागात अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः नावडे परिसरातील प्लॉट नं. २९, रिद्धी-सिद्धी सोसायटी या ठिकाणी मागील वर्षभरापासून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली. मोर्चानंतर सिडको प्रशासनाने नागरिकांच्या मागण्या ऐकून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सिडकोचे पाणीपुरवठा अधिकारी प्रफुल देवरे यांनी सांगितले की,कळंबोली सेक्टर ३ या भागात नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. तसेच नावडे विभागासाठी स्वतंत्र ८ इंच व्यासाची पाईपलाईन टाकण्याचे नियोजन करण्यात आले असून, काही दिवसांतच ही कामे हाती घेतली जातील असे त्यांनी सांगितले. उपाययोजने नंतर नागरिकांना भविष्यात पाणीटंचाईपासून मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तथापि, नागरिकांनी सिडकोने ही कामे वेळेत पूर्ण करावीत, अशी मागणीही केली आहे.

> **नागरिकांच्या पाणी प्रश्नाची दाखल घेत लवकरच कळंबोली तसेच नावडे विभागातील पाण्याच्या नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे भविष्यात नागरिकांना पाण्याचा तुटवडा जाणवणार नाही यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत**
> **–प्रफुल्ल देवरे, सिडको पाणीपुरवठा विभाग कळंबोली**

## विद्यार्थ्यांची मानसिक आरोग्य जागरूकता

**तळा :** गो. म. वेदक विज्ञान महाविद्यालय तळा येथे विद्यार्थी आत्महत्या प्रतिबंधक कार्यक्रम उत्साहात व सकारात्मक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. संदीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्य विषयी जागरूकता निर्माण करणे व आत्महत्या सारख्या टोकाच्या निर्णयापासून त्यांना दूर ठेवणे हा होता. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. एस. एस. मिर्झा, डॉ. सलमा मुजावर, रशिदा रोहावाला, अनघा माने उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सलमा मुजावर यांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी आत्महत्या प्रतिबंधक या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी आत्महत्येच्या कारणांवर प्रकाश टाकत त्यावर उपाययोजना आणि भावनिक सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रा. विजय तरटे यांनी आभार प्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता केली.

# अलिबाग-कुरूळ रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

## नागरिक सर्दी, खोकल्याने त्रस्त


| रेवदंडा | प्रतिनिधी |

अलिबाग-कुरूळ या प्रमुख रस्त्यावर सध्या धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांचे अक्षरशः जीवन त्रस्त झाले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांसोबतच सैल माती आणि उडणाऱ्या धुळीमुळे वाहनचालकांपासून ते पादचारीपर्यंत सर्वांचे जगणे अवघड झाले आहे.

दररोज या रस्त्यावरून शेकडो वाहनांची वर्दळ होत असल्याने हवेत उडणाऱ्या धुळीचे प्रमाण इतकं वाढले आहे की सर्दी, खोकला, ताप आणि श्वसनाचे आजार वाढीस लागले आहेत. लहान मुले, वृद्ध, रुग्णांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत असून नागरिक आजारांनी हैराण झाले आहेत.

धुळीमुळे शेजारील घरांमध्ये धूळ साचत आहे, कपडे, भांडी, अन्नसुद्धा सुरक्षित राहत नाही. नागरिकांना प्रशासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र संताप व्यक्त करावा लागत आहे. स्थानिकांनी संबंधित विभागाकडे तातडीने रस्त्यावर पाणी फवारणी आणि डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे.

मात्र, प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांनी आता आंदोलनाचा इशारा दिला आहे. दरम्यान, या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यांनी या प्रकरणात तत्काळ लक्ष घालून जनतेच्या आरोग्य व जीवनासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी जनतेची मागणी जोर धरू लागली आहे.



### नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**धुळीच्या प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून आरोग्याच्या दृष्टीनेही हा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आहे. अलिबाग- कुरूळ रस्ता तातडीने दुरुस्त करून जनतेला दिलासा देणे हीच काळाची गरज असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.**

## मालवाहतूकीचे महत्त्वाचे साधन | मुंबई पुण्यातून पशुवैद्यकीय पथकांकडून पाहणी

# माथेरानमधील घोड्यांवर तज्ज्ञांकडून उपचार


| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये वाहतुकीचे साधन असलेल्या घोड्यांच्या डोळ्यांना आजार झाला आहे. घोड्यांचा आजार असाच कायम राहिल्यास काही दिवसांनी घोड्यांचे डोळे निकामी ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पर्यटन नगरीच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत असलेल्या घोड्यांना विचित्र रोगाने पछाडले आहे.

शहरातील घोड्यांना कायमचे अंधत्व येण्याचा धोका असल्याने अश्वपालकांवर खर्चाचा डोंगर ओढावला होता. दरम्यान, शासनाने या बाबीची गंभीर दखल घेतली असून शहरातील सर्व घोड्यांची तपासणी सुरू असून मुंबई आणि पुण्यातून तज्ज्ञ डॉक्टर माथेरानमध्ये पोहचले आहेत.

माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणावर घोडे असून मालवाहतूक आणि माणसांची वाहतूक करण्यासाठी ही घोडे वापरले जातात.

पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांचे ये-जा घोड्यावरून सुरू असते. त्यासाठी ४६० घोड्यांची मंजुरी शासनाने दिली आहे. शहरातील मालवाहतूक करण्यासाठी ३३० घोडे असून या सर्व घोड्यांची खरेदी महाग असल्याने घोड्यांना आपल्या कुटुंबातील व्यक्ती सारखे सांभाळले जाते. घोड्यांना चारा पाणी, तसेच आजार यांच्यापासून रोखण्याचे काम अश्वपालक करीत असतात.



मात्र, यावर्षी घोड्यांना वेगळ्या आजाराने ग्रासले असून शहरातील २०-३० घोडे हे वेगळ्या आजाराने ग्रस्त आहेत.

घोड्यांचे डोळे पिवळे पडणे तसेच त्या डोळ्यातून पाणी बाहेर पडणे तसेच डोळ्यांचा रंग बदलणे असे प्रकार घडत असून त्या घोड्यांना नंतर अंधुक दिसू लागले आहे काय? अशी शंका अश्वपालकांना सतावत आहे.

या नवीन आजारामुळे आपल्या घोड्यांना कायमचे दिसेनासे होऊन त्यांना अंधत्व येणार अशी भीती निर्माण झाली आहे.

माथेरानमध्ये पसरलेल्या या नवीन आजारामुळे निर्माण झालेली घबराट याबद्दल समाज माध्यमांवर चर्चा सुरू झाल्यावर गेली काही महिने गायब असलेले माथेरान येथील पशुधन दवाखाना येथील पशुवैद्यकीय अधिकारी पुन्हा माथेरानमध्ये पोहचले आहे.

मात्र, घोड्यांचा आजार दोन चार घोड्यावरून आता २५३० घोड्यांपर्यंत पोहचला आहे. त्याचा परिणाम माथेरानमधील अश्व संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाल्यानंतर मुंबई येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची टीम माथेरान येथे पोहचू लागल्या आहेत.

### महाविद्यालयातील पथक तपासणीसाठी

**मुंबई येथील व्हॅटनिटी महाविद्यालयातील ३० डॉक्टरांचे पथकाने घोड्यांची तपासणी केली. त्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल कांबळे यांनी माथेरान पोलीस ठाणे यांना पत्र पाठवून सर्व घोड्यांची तपासणी करण्याची परवानगी मागितली होती.**

# युद्ध थांबले, पुढे काय?

इस्रायल आणि हमास यांच्यात अखेर युद्धबंदी झाली आहे. गेल्या एका आठवड्यापासून याची चर्चा सुरू होती. इस्रायलने गेल्या सोमवारी गाझा पट्टीतील आपले हल्ले थांबवले. त्यानंतर कालच्या सोमवारी डोनाल्ड ट्रम्प इस्रायलमध्ये दाखल झाले. तेथे युद्ध बंदीची अधिकृत घोषणा झाली. नंतर ट्रम्प इजिप्तमधील शर्म अल शेख या शहरातील शिखर परिषदेला गेले. तिथे इजिप्त, तुर्कस्तान, इंग्लंड, इटली इत्यादी देशांचे प्रमुख नेते हजर होते. त्यांच्या उपस्थितीत हमासच्या बाजूने युद्धबंदीची घोषणा करण्यात आली. पॅलेस्टिनी गाझा प्रदेशातील हमास या दहशतवादी संघटनेने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवर अकल्पितपणे हल्ला केला होता. त्यात बाराशे जण ठार झाले होते. तर २५१ जणांना हमासने ओलिस ठेवले होते. या ओलिसांपैकी अखेरच्या वीस जणांना काल इस्रायलला परत करण्यात आले. याच्या बदल्यात इस्रायलने सुमारे दोन हजार पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली. ही युद्धबंदी या प्रदेशात नवी पहाट आणेल व नव्या युगाची सुरुवात होईल अशी आशा नेतेमंडळींनी व्यक्त केली आहे. मात्र हे सर्व सरळपणाने पार पडलेले नाही. इस्रायल व इजिप्त या दोन्हीकडच्या भाषणांमध्ये ट्रम्प यांनी स्वतंत्र पॅलेस्टिनी देशाच्या मागणीबद्दल बोलण्याचे टाळले आहे. या संघर्षाच्या मुळाशी हाच तर मुख्य प्रश्न आहे. १९४८ मध्ये जेव्हा या भागात इस्रायलचे म्हणजे ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्यात आले तेव्हा पॅलेस्टिनी म्हणजे अरब मुसलमानांच्या प्रदेशावर ते आक्रमण होते. तेव्हापासून या संघर्षाने अनेक वळणे घेतली. १९९० च्या दशकात पॅलेस्टिनींचे नेते यासिर अराफत व इस्रायल यांच्यात नॉर्वे देशात एक करार झाला होता. त्यावेळी इस्रायलने स्वतंत्र पॅलेस्टाईन देशाचे अस्तित्व मान्य केले असे चित्र तयार झाले. पण ते फार काळ टिकले नाही. याचे कारण मुळात इस्रायलला असलेली खुमखुमी आणि पॅलेस्टिनी अरबांबद्दल वाटणारी भीती व असुरक्षितता. दुसरीकडे पॅलेस्टिनी प्रदेशावर अराफत यांच्यानंतर हमास या दहशतवादी संघटनेने कबजा केला. त्यामुळे इस्रायलला छोट्या लढाया आणि आताच्या युद्धाला निमित्ते मिळत गेली.

## नेतान्याहू झुकले

इस्रायलला अमेरिका व युरोपचा कायम पाठिंबा होता. हवी तेवढी शस्त्रे, विमाने, दारुगोळा व पैसा पुरवला जातो. याउलट हमासला आता सौदी अरेबिया किंवा कतारसारखे तेलसंपन्न देशही हात आखडून मदत करतात. या स्थितीत हमासची बाजू दिवसेंदिवस कमकुवत होत गेली. मात्र ऑक्टोबर २३मधील हल्ला अनपेक्षित होता. त्यात इस्रायलचे कधी नव्हे इतके नुकसान झाले. त्यातून इस्रायलला प्रदीर्घ काळ युद्ध चालू ठेवण्यास कारण मिळाले. त्याने त्याचा फायदा घेत गाझाचा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकला. आज युद्धबंदीनंतर जेव्हा इतरत्र गेलेले पॅलेस्टिनी लोक आता गाझात परत येतील तेव्हा तिथे मातीच्या ढिगाऱ्यांशिवाय काहीही शिल्लक नाही. इस्रायलने गेल्या दोन वर्षात क्रूरपणाचा कळस केला. हमासवर हल्ले करण्याच्या नावाखाली पॅलेस्टिनी लोकांच्या वस्त्या, इस्पितळे, शाळा इत्यादी नष्ट करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय संस्थांना तेथे अन्नधान्य, पाणी, औषधे, कपडे इत्यादी पाठवणेही अशक्य झाले. यामुळे दुष्काळ पडला व हजारो मुले मेली. एकूण सुमारे ६७ हजार लोकांचा बळी गेला. हे याआधीच रोखणे अमेरिका व युरोपला शक्य होते. पण ट्रम्प यांची मनोवृत्ती मुस्लिमविरोधी आहे. त्यामुळे त्यांनी इस्रायलला रोखणे तर सोडाच, पण विमाने भरभरून शस्त्रास्त्रे पाठवणे चालू ठेवले. युरोपातील देशांना इस्रायलचे कायमच प्रेम राहिले आहे. पण पॅलेस्टिनींच्या छळकहाण्या व लाखो निर्वासितांची परवड यांची दृश्ये जसजशी मिडियातून येऊ लागली तसतसा युरोपात युद्ध बंद करा म्हणून मोर्चे निघू लागले. त्यांचा दबाव इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, इटली, जर्मनी या देशातील सरकारांवर आला. त्यांच्यापैकी अनेकांनी पॅलेस्टाईन या स्वतंत्र देशाला मान्यता दिली व संयुक्त राष्ट्रसंघाने विशेष बैठक आयोजित करून तसा ठराव केला. यामुळे मग ट्रम्प यांच्यावरही दबाव आला. तिकडे इस्रायली जनताही युद्धाच्या विरोधात बोलू लागली होती. इस्रायलच्या सैन्यात सक्तीची भरती असते. पण तरुण त्याला टाळाटाळ करू लागले होते. खुद्द लष्करी अधिकारीही युद्धाच्या विरोधात होऊ लागले होते. त्यांच्या दबावामुळे अखेर इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांना झुकावे लागले व त्यातूनच ही युद्धबंदी आकाराला आली.

## गाझावर राज्य कोणाचे

नेतान्याहू यांनी आता जरा अधिक चांगले वागावे असा सल्ला ट्रम्प यांनी इस्रायली संसदेत बोलताना दिला. नेतान्याहू हा एक लबाड, कपटी, क्रूरकर्मा नेता आहे. त्यांच्याविरुध्द देशात भ्रष्टाचाराचे अनेक आरोप खटले प्रलंबित आहेत. युद्ध चालू असल्याने त्याची चौकशी स्थगित करण्यात आली होती. देशात आज निवडणुका झाल्या तर नेतान्याहू पराभूत होतील असे चित्र काही दिवसांपूर्वीपर्यंत होते. भ्रष्टाचारची चौकशी आणि निवडणुका टाळण्यासाठी नेतान्याहू यांनी आजपर्यंत युद्ध चालू ठेवले होते. आता युद्ध थांबल्यावर ते पद टिकवू शकतात का हे पाहावे लागेल. ट्रम्पसारख्यांना नेतान्याहू यांच्यासारखे शार्पशूटर गुंड हवेच असतात. त्यामुळे ट्रम्प यांनी नेतान्याहू यांना भ्रष्टाचाराच्या आरोपातून आता माफ करा असा आगाऊपणाचा सल्ला इस्रायली राष्ट्रपतींना दिला आहे. या नेतान्याहूंविरुध्द आफ्रिकेने युद्धगुन्हेगारी केल्याबद्दलचा खटला आंतरराष्ट्रीय न्यायालयात दाखल करण्याची तयारी केली होती. संयुक्त राष्ट्रसंघानेही त्यांच्याविरुध्द ताशेरे मारले होते. त्यावर राष्ट्रसंघाला आपण ओळखत नाही अशी भूमिका नेतान्याहू यांनी घेतली होती. ट्रम्प यांचा त्यांना छुपा पाठिंबा होता. म्हणूनच ट्रम्प यांनी पलेस्टिनी राष्ट्राला मान्यता देण्याच्या ठरावाच्या वेळी राष्ट्रसंघावरच टीका केली होती. आताही नेतान्याहू हे शर्म अल शेख इथल्या इजिप्तमधल्या करारावेळी हजर नव्हतेच. म्हणजेच युद्धबंदी करण्यासाठी इस्रायल व हमास हे पक्ष एकदुसऱ्या समोर आलेले नाहीतच. त्यांच्या वतीने ट्रम्प आणि मंडळी शांततेची हमी देत आहेत. ट्रम्प यांना सध्या सोईचे आहे म्हणून हे सर्व घडत आहे. निवडणुकीच्या वेळी ट्रम्प यांनी जगातील सर्व युद्धे आपण एका दिवसात थांबवू असे आश्वासन दिले होते. या युद्धांमध्ये सैन्य किंवा शस्त्रे पाठवण्यात अमेरिकेचा बराच पैसा खर्च होतो व यात अमेरिकी नागरिकांचे नुकसान होते असा प्रचार त्यांनी त्यावेळी केला होता. अमेरिकी लोकांनाही तो पटला होता. आता तेच त्यांचे पाठिंबादाते ट्रम्प यांना जाब विचारत असून त्यांच्या समाधानासाठी गाझातील युद्ध थांबवणे आवश्यक होते. अमेरिकेची इच्छा असेल तर बटण बंद करून वीज बंद करावी तसे युद्ध थांबवता येते हे पूर्वीही दिसले आहे. त्याचेच पुन्हा इथे प्रत्यंतर आले आहे. मात्र ही शांतता किती टिकणार हा महत्वाचा प्रश्न आहे. शिवाय गाझामध्ये सरकार कोण चालवणार, त्यासाठी पैसे कुठून येणार आणि तेथील लोकांचे रक्षण कोण करणार हे प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत.

विचार

# झोहोः आत्मनिर्भर भारताचे यश

*संगणकप्रणाली निर्यात आणि सेवाक्षेत्रात अग्रेसर भारतीय 'झोहो' ही भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी सध्या बरीच चर्चेत आहे. व्यवसायासाठी आवश्यक आणि वेबवर चालणारी टूल्स आणि सॉफ्टवेअर्स विकसित करणाऱ्या या कंपनीने अनेक यशस्वी बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर उद्योगांपुढे मोठे आव्हान उभे केले आहे. तिची ४५ हून अधिक ॲप्स वेब, डेस्कटॉप तसेच मोबाईलवर सहज वापरता येतात. सध्या तिचा बराच बोलबाला आहे. त्या निमित्ताने.*




डॉ. दीपक शिकारपूर

'वसुधैव कुटुंबकम' ही भारताची संस्कृती असून भारताच्या कामगिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची हाक दिली, स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, एकविसाव्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. त्याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी. सध्याच्या वैश्विकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल. पूर्वी आपण अनेक गोष्टींसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून होतो. उदाहरणार्थ, काही खेळणी, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अगदी काही औषधंसुद्धा बाहेरून मागवावी लागत होती. पण कोरोनासारखे संकट आले, तेव्हा लक्षात आले की, आपण दुसऱ्यांवर अवलंबून राहिलो, तर अडचणीच्या वेळी आपल्याला मदत मिळणार नाही. म्हणूनच 'आत्मनिर्भर' होणे खूप महत्वाचे आहे. हेच अनेक प्रकारे संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर)बद्दलही म्हणता येईल. आपण संगणक प्रणाली निर्यात आणि सेवा क्षेत्रात अग्रेसर असलो तरी हाताच्या बोटावर मोजण्याइतके संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर प्रोडक्ट) विकसन पूर्णपणे भारतात झाले आहे. आता हे चित्र नक्कीच बदलले आहे आणि याला कारण आहे 'झोहो'. झोहोने अनेक यशस्वी बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर उद्योगांपुढे आव्हान उभे केले आहे. झोहो ही एक भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी असून व्यवसायासाठी आवश्यक असणारी वेबवर चालणारी टूल्स आणि सॉफ्टवेअर विकसित करते. बहुचर्चीत 'झोहो वन' या पॅकेजद्वारे ४५ हून अधिक ॲप्स मिळतात. या पॅकेजमुळे सीआरएम, मार्केटिंग, अकाउंटिंग, एचआर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट आणि इतर आवश्यक कार्ये एका ठिकाणी करणे शक्य होते. हे ॲप वेब, डेस्कटॉप आणि मोबाईलवर सहज वापरता येते. चेन्नई शहरातील एका छोट्या अपार्टमेंटमधून सुरुवात करून यशस्वी झालेली 'झोहो' ही एक कंपनी आहे.

ही कंपनी वेब-आधारित बिझनेस टूल्स (व्यवसाय साधने) पुरवणारी एक अग्रणी कंपनी म्हणून उदयाला आली आहे. व्यवसायाचे संपूर्ण कामकाज क्लाउडवरून चालवण्यासाठी लागणारी सर्व प्रमुख ॲप्लिकेशन्स ती एकाच क्लाउड प्लॅटफॉर्मवर पुरवते. झोहोची स्थापना श्रीधर वेम्बू यांनी केली. या कंपनीची नोंदणी अमेरिकेतील न्यू जर्सी येथे 'ॲडव्हेंटनेट इंक' या नावाने झाली. श्रीधर वेम्बू यांनी आयआयटी मद्रासमधून पदवी आणि अमेरिकेतून पीएचडी पूर्ण केल्यानंतर हा व्यवसाय सुरू केला होता. झोहोने २००५ मध्ये झोहो कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मद्वारे आपला प्रवास सुरू केला आणि आता व्यवसायाच्या आणि एंटरप्राइजच्या सर्व विभागांमध्ये विस्तार केला आहे. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियामध्ये आहे, तसेच तिची कार्यालये सिंगापूर, जपान, चीन आणि भारतामध्ये आहेत. कंपनी 'झोहो वन' नावाचे एंटरप्राइजस्तरीय सब्स्क्रिप्शन (सदस्यता) देखील देते. यामध्ये झोहोची ४० ॲप्लिकेशन्स समाविष्ट आहेत. यामुळे सुलभ व्यवसायासाठी एक 'ऑपरेटिंग सिस्टीम' तयार होते. जगभरातील १८० हून अधिक देशांमध्ये या प्लॅटफॉर्मचे ५० दशलक्षाहून (५ कोटींहून) अधिक वापरकर्ते आहेत.

इंजिनीअरिंगद्वारे मार्केटिंग' हे झोहोचे अंतिम व्यवसाय मॉडेल आहे. यामुळे लोकांना सुरुवातीचे कोणतेही शुल्क न देता त्यांची ॲप्लिकेशन्स वापरण्याची संधी मिळते. तसेच ही कंपनी जाहिरातींद्वारे कमाई करत नाही. २०२४ पर्यंत कंपनीमध्ये १७,००० हून अधिक कर्मचारी असून 'फोर्ब्स'च्या मार्च २०२५ च्या अहवालानुसार, झोहोने जाहीर केले की त्यांचे २०२४ या वर्षातील उत्पन्न १.५ अब्ज रुपये होते, जे अंदाजे १२,५२५ कोटी (बार हजार पाचशे पंचवीस कोटी) रुपये इतके आहे. या यशस्वी व्यवसाय मॉडेलमागे केवळ त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता आहे. त्यांच्या 'फ्रीमियम मॉडेल'मुळे सुरुवातीला विनामूल्य साइन-अप करण्याची परवानगी मिळते आणि त्यानंतर गरज असल्यास प्रीमियम अपग्रेड कार्यक्रमासाठी विशिष्ट शुल्क आकारले जाते. झोहो आपल्या नफ्याच्या सुमारे ५० टक्के रक्कम प्रथम नवीन प्रकल्पांमध्ये खर्च करण्यास किंवा पुन्हा गुंतवण्यास प्राधान्य देते. झोहोचा एकूण खर्च स्वाभाविकपणे कमी असतो, कारण कंपनीचा नेहमीच असा विचार असतो की उत्पादने स्वतः बोलली पाहिजेत (उत्पादनांनी स्वतःची जाहिरात केली पाहिजे) आणि त्यामुळे ती मार्केटिंगवर पाच टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणे टाळते. झोहोची सगळी ॲप्स अतिशय युजरफ्रेंडली आहेत. ट्युटोरियल्स आणि व्हिडिओ मार्गदर्शने असल्याने शिकणे सुलभ आहे. झोहो पाचशेपेक्षा अधिक लोकप्रिय ॲप्स, प्रोग्रॅम्सशी सहज जोडता येते. उदा. मायक्रोसॉफ्ट ३६५, गुगल वर्कप्लेस वगैरे. झोहो वापरताना आपल्या व्यवसायासाठी आवश्यक डेटा कस्टम डॅशबोर्डमध्ये पाहता येतो, रिपोर्ट्स मिळतात. विक्री आणि मार्केटिंगसाठी ऑटोमेटेड टास्क्स, फॉलोअप्स, लीड स्कोअरिंग शक्य होते. झोहोची किंमत इतर मोठ्या कंपन्यांच्या तुलनेत कमी आहे आणि फ्री/ट्रायल प्लान सुद्धा उपलब्ध आहे. अँड्रॉइड आणि ॲपल आयओएससाठी कंपनीची सगळी प्रमुख ॲप्स उपलब्ध आहेत. झोहोची भविष्यातील योजना हे तंत्रज्ञान आणि व्यूहात्मक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि नवोन्मेषी आहेत. या योजनांमध्ये एआय एजंट, आयओटी सक्षम सोल्यूशन्स, सिक्युरिटी, नो-कोड/लो-कोड डेव्हलपमेंट, जगभरातील विस्तार आणि दीर्घकालिक पायाभूत संशोधनाचा समावेश होतो. पारंपारिक मोठ्या जनरेटिव्ह एआय मॉडेल्सच्या तुलनेत झोहो विशिष्ट, छोटे आणि उद्योगकेंद्रित एआय एजंट तयार करत आहे. हे एजंट विविध बिझनेस टास्कसाठी वापरण्यात येतात. जसे, ऑटोमेटेड रिपोर्टिंग, सिक्युरिटी, आणि रियल-टाईम डिसिजन मेकिंग. कंपनीच्या झिया एआयच्या माध्यमातून विविध थर्ड-पार्टी अप्लिकेशन्सशी कनेक्टिव्हिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स मिळवता येते. जगभर विस्तार व लोकल इनोव्हेशनच्या पातळीवर बोलायचे तर नवीन डेटा सेंटर्स, स्थानिक कार्यालये, संशोधन केंद्रे आणि स्थानिक समुदाय व विद्यापीठांशी कंपनी आणि उत्पादनांचे सहकार्य आहे. संयुक्त प्रोजेक्ट्स आणि स्थानिक भागीदारीचा विचार करता स्टार्टअप्स, शिक्षणसंस्था आणि आर अँड डी केंद्रात कंपनीतर्फे भागीदारीचे आयोजन शक्य होते.

ॲडव्हान्स्ड सिक्युरिटी आणि कंप्लायन्स टूल्सच्या अनुषंगाने विचार करता लोगो ३६० क्लाउड आणि इंटीग्रेटेड सिक्युरिटी सोल्यूशन एकत्रित करत डेटा प्रोटेक्शन आणि कंप्लायन्स मजबूत करते. भारतीय उद्योग आणि लघुद्योगांना झोहो वापरणे सोपे, किफायतशीर आणि सुरक्षित आहे. हे क्लाउडवर आधारित असल्याने कुठूनही वापरता येते. मोबाईल ॲप्ससह सहज प्रवेश मिळतो. भारतीय बाजाराच्या गरजेनुसार बनवलेले असल्याने लघुद्योगांसाठी स्वस्त आणि सोपे आहे. कंपनीच्या उत्पादनांवर सेव केला जाणारा सर्व डेटा भारतात सुरक्षित ठेवला जातो. त्यामुळे व्यवसाय डिजिटल करण्यासाठी 'झोहो' एक लक्षवेधी पर्याय ठरतो. झोहोची भुरळ पडल्याने अनेक प्रथितयश कंपन्या त्याचे वापरकर्ते झाले आहेत. भारताचे केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मायक्रोसॉफ्ट आणि गूगलच्या उत्पादनांऐवजी त्यांच्या कामासाठी झोहोच्या स्वदेशी उत्पादकता प्लॅटफॉर्मचा स्वीकार केला आहे. त्यांनी इतरांनाही भारतीय तंत्रज्ञान उत्पादने वापरण्याचे आवाहन केले आहे. पीयूष गोयल आणि धर्मेंद्र प्रधानसारख्या इतर केंद्रीय मंत्र्यांनीही झोहोच्या 'अरात्ताई' मेसेजिंग ॲपचा आणि इतर प्लॅटफॉर्मचा वापर सार्वजनिकरित्या स्वीकारला आहे. राजकारणी नव्हेच तर अनेक उद्योगही झोहो वापरतात. भारतातील सर्वात मोठ्या स्टॉक ब्रोकरेज प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या झेरोधानेही आपल्यासाठी आणि ग्राहक व्यवस्थापनासाठी झोहोच्या प्लॅटफॉर्मचा वापर केला आहे. **

# आताची दिवाळी ट्रेंड पुरतीच मर्यादीत?

वैष्णवी वाडकर

देशभरात दरवर्षी दिवाळी धुमधडाक्यात साजरी केली जाते. दिवाळी सण हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण मानला जात असून तो आता काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दिवाळी साजरी करण्यामागेदेखील पौराणिक कथा आहेत. रावणाचा पराभव करुन १४ वर्षांच्या वनवासानंतर आयोध्यापती श्रीराम आपली पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मणासह आयोध्यात परतले. त्यावेळी प्रजेने मातीचे दिवे लावून त्यांचे स्वागत केले. त्याचबरोबर, श्री कृष्णाने नरकासुराचा पराभव केला म्हणून दिवाळीत नरकचतुर्थी साजरी केली जाते. म्हणजेच वाईटावर चांगल्याचा विजय साजरा करण्यासाठी दिवाळी साजरी केली जाते. वर्षभरातल्या चिंता, भय, ताणतणाव, महामारी, आळस झटकून टाकत नव्या उमेदीने जीवनाला आनंदमय करणारा हा सण आहे. परंतु, काळानुसार दिवाळीचे स्वरूप बदलत चालले आहे. त्यामुळे दिवाळी हा सण फक्त ट्रेंडपुरताच मर्यादीत राहिल्याचे निदर्शनास येत आहे.

दिवाळी म्हणजे मुख्यतः प्रकाशाचा सण. वसुबारस ते भाऊबीज असे ५ ते ६ दिवस दिवाळी साजरी केली जाते. दिवाळीत दारोदारी कंदील आणि मातीच्या पणत्या लावून वातावरण प्रकाशमय केले जाते. या दिव्यांच्या प्रकाशामुळे एक सकारत्मक ऊर्जा निर्माण होते. ज्याने संपूर्ण वातावरण उत्साही व आनंदी होऊन जाते. दिवाळी जशी जवळ येऊ लागते तशी दिवाळीतील आवराआवर, रंगरंगोटी, नव्या कपड्यांयह दागिने व वस्तूंची खरेदी केली जाते. त्यामुळे प्रत्येक घरात उत्साह असायचा. दिवाळी जवळ येताच घरातील सर्व मंडळी घराची साफसफाई, सजावट आणि फराळाच्या तयारीत गुंतलेली असायची. दिवाळीतील धनत्रयोदशीच्या दिवशी धनाची पूजा, नरक चतुर्दशीचे अभ्यंग स्नान, लक्ष्मीपूजन आणि भाऊबीज या प्रत्येक दिवसाचा सांस्कृतिक आणि धार्मिक अर्थ होता. मातीच्या आणि सुगंधाच्या पणत्यांनी घर उजळायचे, दारातल्या ठिपक्यांचा रांगोळीने घराला वेगळेच सौंदर्य प्राप्त व्हायचे. तसेच, फराळाचा सुगंध घरभर दरवळायचा. मात्र, या प्रकाशमय आण सांस्कृतीक सणाचे रुप आता काळानुसार बदलत चालले आहे. आत्ताच्या काळात दिवाळी म्हटले कि, एलईडी लाईट्स, डिझायनर कपडे, तय्यार फराळ आणि समाज माध्यमांवर झळकणाऱ्या हैप्पी दिवाळी हॅशटॅग्ससह पोस्ट्स यासर्वांमुळे दिवाळीचे पारंपरिक स्वरूपच बदलले आहे.

आजच्या काळात दिवाळी अत्यंत वेगळ्याच पद्धतीने साजरी केली जाते. सध्याचे जीवन अधिक धकाधकीचे व धावपळीचे झाल्यामुळे प्रत्येकाला दिवाळीची तय्यारी करायला वेळ मिळत नाही. त्यामुळे वेळेअभावी अनेक गृहिणी तय्यार फराळला अधिक पसंती देत आहेत. तसेच, मातीच्या पणत्यांची जागा मेणाचे दिवे व मेणबत्त्यांनी घेतली आहे. पूर्वी एकमेकांच्या घरी जाऊन, फराळाची देवाण-घेवाण करून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या जात होत्या. मात्र, आता समाज माध्यमांवरून मेसेज करून किंवा स्टोरीजद्वारे शुभेच्छा दिल्या जातात. तसेच, फराळ व पारंपरिक भेटवस्तूंऐवजी चॉकलेट किंवा मिठाईचे बॉक्स भेटवस्तू म्हणून दिले जात आहेत. काही ठिकाणी आजही पारंपारिक पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते. दिवाळी निमित्त एकमेकांची भेट घेतली जाते, शुभेच्छा दिल्या जातात, घर पणत्यांनी उजळवता. परंतु, हे सर्व फक्त सोशल मिडीयावरच दिसते. कारण काही जण फोटोशुट साठी पारंपारिक सोंग घेतात. त्यामुळे दिवाळी हा सण आता समाज माध्यम आणि ट्रेंड पुरतीच मर्यादीत राहिल्याचे चित्र निर्माण झाले असून दिवाळी म्हणजे फोटोशूट आणि फॅशनचा खेळ झाल्याचे बोलले जात आहे.

डिजिटल दुनियेच्या प्रभावाआधी पारंपरिक दिवाळी साजरी केली जात होती. परंतु, आताची दिवाळी अनुभवण्यापेक्षा दिखाव्यासाठीच जास्त साजरी केली जाते. काही गावा-खेड्यांत अजूनही पारंपरिक पद्धतीनेच दिवाळी साजरी केली जाते. परंतु, आताची दिवाळी पारंपारिक दिवाळीसारखी वाटतच नाही, असे अनेकदा बोलले जाते. त्यामुळे आधुनिक युगात दिवाळीचे अस्सल रूप कुठे तरी हरवत चालले आहे. दिवाळी सण म्हणजे एकमेकांना भेटून नाती घट्ट करण्याची संधी असते. परंतु, समाज माध्यमांवरील दिखाव्यात पारंपरिक दिवाळीचा सर्वांना विसर पडत आहे. त्यामुळे सणांच्या खऱ्या आनंदापासून आताची पिढी दुरावत चालली आहे.

त्यामुळे आताच्या पिढीला पारंपारिक दिवाळी कशी साजरी केली जाते, हे सांगणे गरजेचे आहे. पुर्वी दिवाळीच्या तोंडावर दारासमोर किल्ल्यांची प्रतिकृती उभारली जायची. त्यालाही एक महत्व होतं. ज्याचा विसर पारंपारिक दिवाळी साजरी करणाऱ्यांना देखील पडत चालला आहे. समाज माध्यमांचा वापर करणे ही काळाची गरज आहे; मात्र, सणांना समाज माध्यमावरील दिखाव्यांपासून तरी दुर ठेवने गरजेचे आहे. त्यामुळे दिवाळी सण फक्त समाज माध्यमांवर साजरी न करता फक्त ट्रेंड म्हणून नव्हे तर परंपरा आणि त्यामागील महत्व समजून साजरी करणे गरजेचे आहे.

लोकसंसद



## दिवाळी अंकांची वैभवशाली सांस्कृतिक परंपरा

मराठी माणूस, दिवाळी आणि दिवाळी अंक यांचे अतूट असे एक सांस्कृतिक नाते आहे. खरे तर दिवाळी जसजशी जवळ येत जाते तसतसा मनोमनी आनंदाचा, उत्साहाचा झरा वाहू लागतो. दिवाळीची वैशिष्ट्ये म्हणजे करंज्या, लाडू इत्यादी दिवाळीचा फराळ, आकर्षक आकाश कंदील, पणत्या, रांगोळ्या असतात तसेच वाचकांना बौद्धिक खुराक देणारे दिवाळी अंकही या दीपोत्सवाचा एक अविभाज्य भाग असतात. अशा या आपल्या दिवाळी अंकांना एकशेसोळा वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. दिवाळी अंकांच्या इतिहासात डोकावून पाहिले असता अनेक मराठी ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि प्रतिथयश साहित्यकांची, लेखकांची, कवींची साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात दिवाळी अंकांतूनच झाली असल्याचे दिसून येते. १९०९ साली प्रसिद्ध झालेल्या 'मनोरंजन' मासिकाच्या पहिल्या वहिल्या दिवाळी अंकात बालकवींची सुप्रसिद्ध 'आनंदी आनंद गडे' ही कविता प्रसिद्ध झाली होती, हे एकच उदाहरण बोलके आहे. दरवर्षी दर्दी वाचक दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहत असतात. विविध विषयांवरचे मान्यवरांचे माहितीपूर्ण लेख, ललित लेख, कथा, कविता, तत्कालीन विषयांवरील चर्चात्मक संवाद अशा अनेक प्रकारचा दर्जेदार मजकूर दिवाळी अंकांमधून प्रकाशित केला जातो. यंदाही आरोग्य, कलाक्रीडा, चित्रपट, पर्यटन, पर्यावरण अशा वेगवेगळ्या विषयांना वाहिलेले दिवाळी अंक बाजारात आले आहेत. वाचन आनंदासाठी त्यांचे स्वागत करूया आणि महाराष्ट्राची दिवाळी अंकांची ही वैभवशाली सांस्कृतिक परंपरा पुढे नेऊया!

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# जागतिक हात धुणे दिन

जागतिक हात धुणे दिन दरवर्षी १५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे आणि योग्य पद्धतीने हात धुण्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. २००८ साली ग्लोबल हँडवॉशिंग पार्टनरशिपने हा दिवस सुरू केला, जो विशेषतः साबणाने हात धुण्याच्या महत्वावर जोर देतो. योग्य पद्धतीने हात धुणे हा संसर्गजन्य आजार, जसे की अतिसार, श्वसन रोग आणि अगदी -१९ सारख्या महामारीपासून बचाव करण्याचा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. जगातील अनेक लोकांना अद्याप स्वच्छ पाणी आणि साबण उपलब्ध नसल्यामुळे, स्वच्छतेबाबत जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या दिवशी विविध कार्यक्रम, शिबिरे आणि प्रात्यक्षिके आयोजित केली जातात ज्याद्वारे हात धुण्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवले जाते. शाळा, आरोग्य केंद्रे आणि सार्वजनिक ठिकाणी हात धुण्याच्या सुविधा वाढविण्यावरही भर दिला जातो. आपण जवळजवळ प्रत्येक गोष्टीसाठी आपले हात वापरतो: खाणे, काम करणे, पृष्ठभागांना स्पर्श करणे आणि इतरांना अभिवादन करणे. न कळत, ते दिवसभर हजारो जंतू गोळा करतात. योग्य हात धुण्याशिवाय, हे जंतू सहजपणे आपल्या शरीरात प्रवेश करू शकतात किंवा इतरांमध्ये पसरू शकतात, ज्यामुळे असे आजार होतात: सामान्य सर्दी आणि फ्लू, अतिसाराचे आजार, कोविड-१९ आणि इतर विषाणूजन्य संसर्ग, अन्नजन्य आजार, डोळे आणि त्वचेचे संक्रमण 'हात धुणे' आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, याची जाणीवदेखील सर्वांना आहे. कोरोना साथीच्या दरम्यान, तर वारंवार सॅनिटायझर वा हॅण्डवॉशच्या मदतीने हात धुण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात होता. त्यावेळी कधी कुणाच्या जिवाचं काय होईल असं भयभीत करणारं, अनिश्चिततेचं वातावरण होतं. आपल्या जिवावर बेतू नये यासाठी आपण सर्वांनी हात धुण्याचा नियम काटेकोरपणे पाळला. असं असलं तरी, जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत हा साधा, सोपा पण जिवाचं रक्षण करणारा संदेश गेला पाहिजे. अस्वच्छ हातामुळे अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. अस्वच्छ हाताने जेवल्याने तोंडाद्वारे घातक जिवाणू-विषाणू शरीरात प्रवेश करतात. डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म रोगजंतू आपल्या हातावर असतात. या रोगजंतूंमुळे हात दूषित होतात. त्यामुळे हात स्वच्छ न धुतल्यास या दूषित हातांमुळे रोगजंतूंचा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे प्रसार होतो. हातातील घाणीमुळे जुलाब, डोळे, त्वचारोग असे अनेक आजार उद्भवतात. ही घाण आणि जंतू कोणत्याही वस्तूला स्पर्श करणे, तिचा वापर करणे आणि अनेक प्रकारचे दैनंदिन काम केल्याने होते. या रोगजंतूंमुळे जुलाब, अतिसार यांसारखे पचनसंस्थेशी संबंधित आणि सर्दी-खोकला (इन्फ्लुएंझा), न्यूमोनिया, करोनासारखे श्वसन संस्थेशी संबंधित आजार होऊ शकतात. काही वेळा हे आजार गंभीर स्वरूपदेखील धारण करतात. प्रसंगी जिवावर बेतू शकतं. विशेषतः पाच वर्षांखालील बालकांमध्ये या आजारांनी गंभीर रूप धारण केल्यास, मृत्यूची शक्यता जास्त असते. असे जिवावर बेतणारे आजार फक्त 'हात धुण्या' च्या सवयीमुळे नियंत्रणात राहू शकतात. याची जाणीव या 'हात धुवा दिवसा'च्या निमित्ताने लोकांना झाली पाहिजे. हात धुण्याच्या बाबतीत दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे 'ठरावीक वेळेस हात धुण' आणि दुसरी म्हणजे 'साबणाचा उपयोग करून हात धुणं' अद्यापही अनेक लोकांना 'हात कसे धुवावेत?' याबाबत माहिती नाही. लोक सहसा हात धुण्याच्या नावाखाली फक्त औपचारिकता पार पडतात. चुकीच्या पद्धतीने 'हात धुणे' हे हात न धुण्याइतकेच घातक आहे. त्यामुळे हात नेहमी योग्य पद्धतीने आणि स्वच्छ धुतले पाहिजे. किमान २० सेकंद हात धुणे आवश्यक आहे. साबणाने हात धुताना तळहातासह हाताचा मागचा भाग, हाताची बोटे आणि नखे यांच्यातील जागा साबण लावून नीट स्वच्छ केली पाहिजे. या पद्धतीने हात धुतल्यास हातावर असलेले व्हायरस, जिवाणू किंवा हानीकारक घटकांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. लक्षात ठेवा, नेहमी आपला चेहरा धुण्याच्या अगोदर आपले हात स्वच्छ धुवा. हात न धुता चेहऱ्याला हात लावल्यास तोंड, नाक आणि डोळ्यांद्वारे रोगजंतूंचा प्रसार होऊ शकतो. ज्याची आपल्याला अनेकदा जाणीवही होत नाही.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ ऑक्टोबर

१) श्री. गोविंद दत्तात्रेय नाईक
विद्यानगर- अलिबाग,
१५-१०-१९४२

२) श्री.सुधाकर जनार्धन म्हात्रे
वेश्वी, अलिबाग
१५-१०-१९४५


३) श्री.हरिश्चंद्र शंकर मगर
वेश्वी, अलिबाग
१५-१०-१९५०

४)श्री.डॉ.भालचंद्र किसन लोंढे
बायपास रोड, अलिबाग
१५-१०-१९५१

५)श्री.प्रभाकर गोविंद पाटील
चेंढरे-अलिबाग
१५-१०-१९४४

६)श्री.डॉ.प्रमोद रामराव कुमठेकर
श्रीबाग-२, अलिबाग
१५-१०-१९५६

## सुवर्णकण



अध्यात्म ज्ञान हेच मुळी अनुभवावर आधारित आहे. सश्रद्ध साधकालाच त्या ज्ञानाचे पचन करता येते.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# सागरी सुरक्षा रामभरोसे

## ● मच्छिमार बांधवांकडून नाराजी



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

सागरी किनाऱ्याची सुरक्षा ही अत्यंत संवेदनशील आणि प्राधान्यक्रमातील बाब मानली जाते. त्यामुळे गस्त घालून समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सागरी सुरक्षारक्षकांची नियुक्ती केली आहे. मात्र, सागवे-कातळी येथे झालेली शिसे चोरीप्रकरणासह अन्य काही प्रकरणांनी समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सागरी किनाऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी लाखो रुपये खर्चून उभारलेली सागरी सुरक्षारक्षक यंत्रणा रामभरोसे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सुरक्षारक्षकांकडून नियमित गस्त घालून या साऱ्या गोष्टींवर पायबंद राखणे अपेक्षित असते. यासाठी शासनाकडून दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र, तालुक्यातील सागवे-कातळी येथे झालेल्या शिसे चोरीप्रकरणाने सागरी सुरक्षारक्षक कवचाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सागरी सुरक्षारक्षक केवळ नावालाच किनाऱ्यावर असतात.

संशयास्पद हालचालींकडे त्यांचे कोणतेही लक्ष नसल्याचे स्पष्ट करत मच्छीमार बांधवांकडून यापूर्वी अनेकवेळा त्याबाबत नाराजीही व्यक्त केली गेली आहे. अनेकदा परराज्यातील बोटी येऊन मासेमारी करत असतात. याची सुरक्षारक्षकांना कल्पना असते की नाही, त्याबाबतच्या नोंदी सुरक्षारक्षकांकडून संबंधित विभागाकडून कधी घेतल्या जातात की, नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सागरीसुरक्षेचे कवच अधिक मजबूत करण्यासाठी सागरी सुरक्षारक्षकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे याबाबत प्रशासनाकडून वेळीच योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही लोकांकडून केली जात आहे.

> **यापूर्वी अनेकवेळा काही सुरक्षारक्षकांना बाहेरून येणाऱ्या बोटीवर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. तसेच रात्री-अपरात्री गावात अनोळखी खलाशी फिरू नयेत, यासाठी ताकीद दिली आहे. काही गैरव्यवहार सुरू असल्याची शंका असल्यास त्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी सुरक्षारक्षकांना बजावली आहे. मात्र, अपवाद वगळता काही रक्षक आमच्या सूचनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात आणि बेफिकीरपणे वागताना दिसतात. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात येणार आहे.**
>
> **- परशुराम डोर्लेकर, मच्छीमार नेते**

## कोयना, साईनगर शिर्डी एक्स्प्रेसवर दगडफेक

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुंबईच्या दिशेने धावणाऱ्या कोयना एक्प्रेस व साईनगर शिर्डी एक्प्रेसवर मंगळवारी माथेफिरूंनी दगडफेक केल्याची संतापजनक घटना बदलापूर वांगणीदरम्यान घडली. पहाटे पावणेसहाच्या सुमारास अंबरनाथ रेल्वे स्टेशन सोडल्यानंतर कोयना एक्प्रेस मुंबईच्या दिशेने निघाली. अंबरनाथ-बदलापूर स्टेशनदरम्यान अचानक दगडफेक सुरू झाली. तर सकाळी साडेदहाच्या सुमारास वांगणी रेल्वे स्टेशन परिसरात साईनगर शिर्डी एक्प्रेसवर माथेफिरूंनी दगडफेक केली. या दोन्ही घटनांमध्ये गाड्यांच्या खिडकीच्या काचा फुटल्या. एकाच दिवसात दोन ठिकाणी घडलेल्या या घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. रेल्वे सुरक्षा बल आणि कल्याण रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. हल्लेखोरांनी दगडफेक केल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्यांचा शोध घेण्यासाठी कल्याण रेल्वे पोलीस घेत आहेत.

## अंगणवाडी सेविका करणार आंदोलन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमहा दोन हजार रुपये व मतदनीसांना दरमहा एक हजार रुपये प्रोत्साहन भत्ता देण्यासंदर्भात ४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनाने आदेश दिले आहेत. त्यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोषण ट्रॅकर ॲपवर आपल्या कामाची नोंद करणे बंधनकारक केले आहे. राज्यात काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांपैकी ८० टक्क्यापेक्षा जास्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोषण ट्रॅकर ॲपवर काम करूनसुध्दा प्रोत्साहन भत्त्याची रक्कम देण्यात आलेली नाही. तसेच मातृवंदना योजना कामाची सक्ती असल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामात अडथळा निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे मुख्यसेविका व पर्यवेक्षिका यांच्या सूचनेप्रमाणे अंगणवाडी मदतनीसांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरले असून त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीसांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. राज्यभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या राज्य सरकारच्या निदर्शनास आणून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे बृजपाल सिंह, कॉ. शुभा शमीम, कॉ. दिलीप उटाणे, भगवानराव देशमुख, कॉ. जीवन सुरुडे, जयश्री पाटील, कमल परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली १५ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर आंदोलन करणार आहेत.

## पाणीपुरवठा विस्कळीत

**रत्नागिरी :** गेल्या काही दिवसांपासून पाऊस पूर्णपणे थांबला आहे. तसेच कोळकेवाडी येथील वीजनिर्मितीही कमी झाल्याने तेथून वाशिष्ठीत होणारा विसर्गही कमी झाला आहे. याचा परिणाम म्हणून वाशिष्ठी नदी कोरडी पडत आहे. याचा फटका गोवळकोट येथून गोवळकोट, कोवळकोट रोड, पेठमाप, मुरादपूर, उक्ताड, अर्धी बाजारपेठ या अर्ध्या शहराच्या पाणीपुरवठ्यावर झाला आहे. या भागांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने महिलावर्गामध्ये नाराजी पसरली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्याकडे लक्ष दिले आहे. वाशिष्ठी नदीत पाण्याचा विसर्ग करा, असे पत्र नगर परिषदेने कोळकेवाडी धरण व्यवस्थापनाला दिले आहे.



## विद्यार्थी, पालकांसाठी मार्गदर्शन शिबीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भैरवदेव विद्यालय, रिटघर, पनवेल तालुका ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या वतीने ११वी व १२ वी विद्यार्थी व त्यांच्या पालक वर्गासाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. यात क्राईम, गुन्हे, सायबर सुरक्षेततेबद्दल हेल्प नंबर १९३०, पोलीस हेल्प नंबर ११२, मोबाईलचा दुरुपयोग, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरासाठी, पनवेल तालुका सहायक पोलीस निरीक्षक गौरव इंगोले यांनी महिला, पालक वर्गासाठी व विद्यार्थी मित्रांसाठी योग्य मार्गदर्शन दिले. यावेळी सरपंच सुभाष भोपी यांनीदेखील मार्गदर्शन केले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी, व स्कूल कमिटी सदस्य, रिटघर पोलीस पाटील, मोरबे गाव पोलीस पाटील, खानाव पोलीस पाटील, गावातील समाजसेवक, मुख्याध्यापक, शिक्षक व मोठ्या संख्येने माता, भगिनी व पालक वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.

## इलेक्ट्रिक सायकल शोरूमचे उद्घाटन

### ● आरोग्यदायी जीवनशैलीकडे एक पाऊल: संदेश बैकर



**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पांडवादेवी येथे शुक्रवारी (दि.१०) श्रीजा इलेक्ट्रॉन ई-सायकल शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य, उपाध्यक्ष रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे संदेश बैकर आणि डॉ. भक्ती बैकर, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, संचालक डॉ. नितीन गांधी, डॉ. राजाराम हुलवान, डॉ. अफान कुरेशी, प्रभाकर पाटील (हिरो होंडा शोरूम मॅनेजर) तसेच महिला बचत गटाच्या सदस्या उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे आयोजन निसर्गोपचार तज्ज्ञ, संस्थापक हिजामा अँड नॅचरोपॅथी क्लिनिक इंडियाचे प्रज्योत पाटील यांच्या संकल्पनेतून श्रीजा इंटरप्रायजेस हे इलेक्ट्रिक सायकल शोरूम साकार झाले आहे. तसेच, ग्रामीण भागात पर्यावरणपूरक व इंधनमुक्त वाहनांचा प्रसार व्हावा हा यामागील मुख्य हेतू आहे, असे आयोजकांनी सांगितले.

## सुशीला धाटावकर यांचे निधन



**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहे शहरातील संत गोरोबा नगर दमखाडी येथील सुशीला उर्फ तुळसाआई रामभाऊ धाटावकर यांचे रविवारी (दि.५) वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. कुंभार समाजातील सुशीला तुळसाआई यांनी आपल्या कुंभार कलेचे मातीचे काम न सोडता सातत्याने मटकी, गाडगी, सुगडे, चुली आदींसह हंगामानुसार दिवाळी पणत्या, सुगडी तयार करणे व बाजारपेठेमध्ये विक्री करून आपल्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह केला. याची तालुक्यासह जिल्ह्यातील कुंभार समाज मंडळाने दखल घेत महाराष्ट्र राज्यस्तरीय गुणवंत कलाकार पुरस्कार देऊनही सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे पांडुरंग (सुनिल) आणि अनिल तर दोन मुली सुनीता आणि अनिता, सुना, जावई, नातवंडे, पतवांडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार दि.१४ रोजी, तर अंतिम धार्मिकविधी शुक्र. दि.१७ रोजी होणार राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

**। मागणाव । प्रतिनिधी ।**

संगीतप्रेमी म्युझिकल ग्रुपतर्फे सूर तेच छेडीता... या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दि.१७ ऑक्टोबर रोजी ज्योती बंगला, ज्योती सुरेश बुटाला, मुंबई-गोवा हायवे अंबिका हार्डवेअर शेजारी, माणगाव येथे होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने माणगावमधील नामवंत गायकांचा सदाबहार ताल.....सूर याला उत्तम अशा तबला वादक - हार्मो निअम व संगीताची जोड या त्रिवेणी संगमातून दिवाळी पहाटची मेजवानी उपस्थित रसिक प्रेक्षकांना मिळणार आहे. या कार्यक्रमात गायक राजेंद्र पोवार, ॲड.मोहन मेथा, डॉ. श्रीकांत वैद्य, आशा राऊत, डॉ. चंद्रशेखर साकोलीकर, डॉ.सचिन चव्हाण, डॉ. अक्षरा चव्हाण, स्नेहल परांजपे, दिक्षा देसाई, डॉ. सुकेशनी डोंगरे, रजनी शेट, धनश्री मेहता, डॉ. स्नेहा राऊत, वादक- अनंत करंदीकर, रायगड भुषण राकेश मेस्त्री यांच्या सुरेल मैफिलीने दिवाळी पहाट कार्यक्रम रंगणार आहे. या कार्यक्रमाचा रसिक प्रेक्षकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## रानडुकरांकडून भातशेतीचे नुकसान

**रत्नागिरी :** पावसाने थोडी उसंत घेतल्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र भात कापणीची तयारी सुरू झाली आहे. मात्र कापणीयोग्य झालेल्या भाताची रानडुक्करांकडून नासधूस होत आहे. लोंब्यांमध्ये दाणे भरू लागले असून त्यावर रानडुक्कर हल्ला मारत आहेत. रत्नागिरी तालुक्यातील भगवतीनगर येथील उमेश रहाटे यांनी अडीच एकर क्षेत्रावर भातशेती केली होती. त्यांच्या सव्वादोन एकर क्षेत्रापैकी एकर क्षेत्रातील भात रोपांचे नुकसान झाले आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ



**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, पडसरे येथील विद्यार्थ्यांनी उपक्रमांतर्गत तयार केलेल्या विविध वस्तूंचा आकर्षक विक्री स्टॉल पाली नगरपंचायती परिसरात उभारण्यात आला आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या श्रम, कौशल्य आणि कल्पकतेला प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळत आहे.

या स्टॉलमध्ये आकर्षक रंगीबेरंगी पणत्या, क्रिएटिव्ह डिझाइन्स असलेले उठणे, सुगंधी साबण, परफ्यूम, लाईटमाळ, फिनेल यांसारख्या उपयुक्त वस्तू किफायतशीर दरात उपलब्ध आहेत. या वस्तू केवळ विक्रीसाठी नसून, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या कलाकृतींचे प्रत्यक्ष दर्शन आहेत.

विद्यार्थ्यांनी या वस्तू तयार करताना स्थानिक संसाधनांचा वापर, स्वच्छता, सौंदर्यदृष्टी आणि उपयुक्तता यांचा समतोल साधला आहे. हा स्टॉल म्हणजे त्यांच्या मेहनतीचे आणि प्रशिक्षणाचे मूर्त स्वरूप आहे. या उपक्रमातून आदिवासी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक शिक्षणच नव्हे, तर उद्योजकतेचा आत्मविश्वासही मिळत आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका करणार प्रयत्न | आयुक्त भूषण गगराणी यांची ग्वाही**

# पर्यटकांना मिळणार दर्जेदार, सर्वसमावेशक सुविधा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

संस्कृती, इतिहास आणि आधुनिकतेचा अनोखा संगम असलेले मुंबई महानगर देश-विदेशातील पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या चैतन्यपूर्ण नगरीत पर्यटकांना सुखद आणि अविस्मरणीय अनुभव मिळावा, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे. पर्यटकांना दर्जेदार व सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध करून देण्यास महानगरपालिका कटिबद्ध आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाशी समन्वय साधून अधिक सुविधा विकसित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पर्यटक मार्गदर्शन आणि सहकार्य यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, अशी ग्वाही महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मुंबई पर्यटन या विषयावर संयुक्त बैठक महानगरपालिका मुख्यालयात सोमवारी (दि.१३) पार पडली. यावेळी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी बोलत होते. तसेच, व्यवसाय सुलभता धोरणांतर्गत चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी एक खिडकी योजनेद्वारे परवानग्या दिल्या जात आहेत. भायखळा येथे १५ एकर जागेवर वस्त्र संग्रहालय उभारले जात आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वासदेखील गगराणी यांनी व्यक्त केला.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक गगराणी म्हणाले की, मुंबईकरांना मूलभूत सेवासुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. तसेच, पर्यटनविषयक अनुषंगिक कामे, पर्यटन प्रचार देखील महानगरपालिकेमार्फत केला जात आहे.

पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे म्हणाले की, राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन आणि विकास देण्यासाठी महाराष्ट्र शासन समर्पित आहे. पर्यटन क्षेत्रात पायाभूत सुविधा वाढवणे, धोरणात्मक योजना तयार करणे आणि शाश्वत पर्यटन उपक्रम राबविणे हे पर्यटन विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे. श्रीगणेशोत्सव आणि हिंदवी स्वराज्य महोत्सव यांसारखे सांस्कृतिक, ऐतिहासिक कार्यक्रम आणि उत्सव आयोजित करून पर्यटन विभागाने महाराष्ट्राचा अद्वितीय वारसा आणि चैतन्यशील संस्कृती अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. अजिंठा आणि वेरूळ लेणी यासारखी युनेस्कोची जागतिक वारसा स्थळे, माथेरान आणि लोणावळा सारखी नयनरम्य गिरीस्थानके, मुंबईसारखे महानगर यासारख्या पर्यटन स्थळांचा समृद्ध संग्रह आहे. इको-टुरिझम, साहसी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था विशेषत: महानगरपालिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्याची सुरूवात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून व्हावी, ही अपेक्षा आहे. पर्यटनवाढीसाठी पर्यायाने अर्थव्यवस्था वाढीसाठी मुंबईच्या क्षमतेचा उपयोग करणे आवश्यक आहे, असेदेखील पाटणे यांनी नमूद केले.

> **मुंबई महानगरात पर्यटनाची मोठी क्षमता, सामर्थ्य आहे. पर्यटक आकर्षित व्हावेत, पर्यटनाला चालना मिळावी, यादृष्टीने महानगरपालिका विविध पावले उचलत आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने आणि समन्वयाने त्यात आणखी सुधारणा करण्यात येतील.**
>
> **- भूषण गगराणी, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक**

## निवडक



### माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तळा :** इंग्लिश स्कूल तळाच्या सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी अ व ब या तुकडीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. हा कार्यक्रम रविवारी (दि.१२) ना.म. जोशी विद्या संकुल, परेल, मुंबई या ठिकाणी पार पडला. तब्बल तीस वर्षानंतर सर्व विद्यार्थी एकत्र आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी आपला तीस वर्षांपूर्वीचा शालेय जीवनातील अनुभव सांगत असतानाच पुन्हा एकदा ते शालेय खोडकर जीवन काही तासांकरिता का होईना पण अनुभवायला मिळत आहे, याबाबत आनंद व्यक्त केला. उपस्थित प्रत्येकाने आपण दहावी शिक्षण झाल्यानंतर पुढील कोणते शिक्षण घेतले, सध्या आपण काय करत आहोत आणि आपल्या कुटुंबाविषयीची माहिती उपस्थित मित्रांना दिली. यावेळी त्यांनी इयत्ता दहावीला असणारे मुख्याध्यापक, आपले वर्ग शिक्षक, विविध विषयांचे सर्व शिक्षक यांनी त्या कालावधीत आपल्याला दिलेले मोलाचे सल्ले याबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

### आदिवासी कुटुंबियांना दिवाळी भेट



**पाली/गोमाशी :** गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्या वतीने रविवारी (दि.१२) वाकणवाडी आदिवासीवाडी येथील ५० कुटुंबांना दिवाळी सणानिमित्त साहित्य भेट देण्यात आले. या साहित्यामध्ये ५० ब्लँकेट, ५० सहावारी साड्या, २० नऊवारी साड्या, ५० टॉवेल, मिठाई बॉक्स यांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना टी-शर्ट, ट्रॅक्स पॅन्ट तसेच ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हे साहित्य उल्हास केदारी यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झाले. साहित्य वाटप झाल्यानंतर सर्व उपस्थित ग्रामस्थांनी, महिलांनी, तरुणांनी पाहुण्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाकरिता गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे संस्थापक अध्यक्ष गोरख पाटील, मयूर बोडेकर, श्रेयश पाटील, नितेश दळवी (उपसरपंच), पांडुरंग पारधी उपस्थित होते.



**आगरदांडा :** मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील सूर्यास्त पाहण्याचा आनंद काही वेगळाच असतो. जसजसा सूर्य मावळतीला जातो तसतशा बदलत जाणाऱ्या रंगछटा डोळ्यांचे पारणे फेडतात. येथील वाळू समुद्रातील पाण्याचा रंगही सोनेरी होत असतो. सूर्यास्ताची किरणे ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ल्यावर पडत असल्याने हा किल्लाही मनमोहक रूप धारण करतो. हे दृश्य पाहण्यासाठी पर्यटक येथे थांबून असतात.

**(छाया: गणेश चोडणेकर)**

### गोवे शाळेत शिक्षकांचा निरोप समारंभ



**कोलाड :** रा.जि.प.शाळा गोवे-कोलाड येथील शिक्षक जयेश महाडिक व उपशिक्षिका रंजना रामराव गांधारे यांची शासकीय बदली झाल्यामुळे त्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसहित पालकांचेही अश्रू अनावर झाले. गेली १५ वर्ष शिक्षकी पेशांमध्ये एक आदर्श निर्माण करून दिवस-रात्र विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मार्गदर्शक म्हणून कार्यरत असणारे शिक्षक जयेश महाडिक व उपशिक्षिका रंजना गांधारे यांचे नाव कोलाड पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. रंजना गांधारे उपक्रमशील शिक्षिका, तंत्रस्नेही व विद्यार्थी प्रिय शिक्षिका म्हणून त्यांची ओळख आहे. शाळेचा विकास, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावे म्हणून विविध मैदानी स्पर्धा, भाषण, निबंध लेखन अशा विविध स्पर्धेतून विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य रंजना गांधारे व जयेश महाडिक यांनी केले. एक सातत्यपूर्ण व प्रामाणिकपणाने केलेल्या कामाची पोच पावती खऱ्या अर्थाने निरोप समारंभाच्या दिवशी दिसून आले.




### बशीर किरकिरे पुरस्काराने सन्मानित

**माणगाव :** माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे मोर्बा येथील सामाजिक कार्यकर्ते बशीर किरकिरे यांना समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बशीर किरकिरे यांना हा पुरस्कार माणगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, कार्याध्यक्ष मजीद हाजीते यांच्यासह जेष्ठ पत्रकार कमलाकर होवाळ यांच्या हस्ते देण्यात आला. या पुरस्काराबद्दल किरकिरे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

## निवडक



### प्रतिकात्मक टाळे ठोकून आंदोलन

पनवेल : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह प्रवासी वर्गाल याचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. याची दखल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून दखल घेण्यात आली असून मंगळवारी (दि.१४) पनवेल महानगरपालिकेला प्रतीकात्मक टाळे ठोकून आंदोलन करण्यात आले. तसेच, यापूर्वी काळ्या यादीत टाकण्यात आलेल्या ठेकेदारांना पुन्हा कामे देण्यात येत असल्याचा आरोप देखील शिवसेनेने केला आहे. या आंदोलनात शिवसैनिकांसह महिला आघाडीचाही मोठ्या संख्येने सहभाग होता. यावेळी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.



### रस्त्यावर दगड, मातीचे ढिगारे

पनवेल : तक्का वरून पनवेलकडे येणाऱ्या रस्त्यावर सध्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर एका बिल्डरकडून भरावासाठी लागणारी माती आणि दगड मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना रिक्षा, दुचाकी तसेच मोठ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, पादचाऱ्यांना देखील जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागत आहे. तसेच, या रस्त्यावर धूळ उडत असल्याने परिसरातील नागरिकांनाही त्रास होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.



### मानवाधिकार आयोगाच्या कार्यालयाचा शुभारंभ

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील शेलू या गावी अखिल भारतीय मानवाधिकार आयोगासह कार्यालय उघडण्यात आले आहे. अखिल भारतीय मानवाधिकार आयोगाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बिनिता बर्फ यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. शेलू गावात अखिल भारतीय मानवाधिकाराच्या माध्यमातून सामाजिक कामे करण्यात सुसूत्रता यावी, यासाठी हे कार्यालय उघडण्यात आला आहे. या प्रसंगी संघटनेच्या महाराष्ट्र अध्यक्ष विनिता बर्फे तसेच नवी मुंबई अध्यक्ष डॅनी डिसूजा, कर्जत बचत गटाच्या समूह संसाधन व्यक्ती रेखा हिरेमठ, जिल्हा अध्यक्ष सुनिता कदम आदी उपस्थित होते.

### सुशिक्षित बेरोजगारांना ओळखपत्र प्रदान

उरण : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत घारापुरी येथील सुशिक्षित बेरोजगारांना लोकल गाईड ओळखपत्र देण्यात आले. मंगळवारी (दि.१४) घारापुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे छोटेखानी झालेल्या कार्यक्रमात ओळखपात्रांचे वाटप करण्यात आले. घारापुरी हे बेट असल्याने बेटावर रोजगारासाठी अन्य कोणताही पर्याय नसल्याने या ओळखपत्रामुळे या ग्रामस्थांना रोजगार करण्यास सोपे जाणार आहे. याआधी सुद्धा ग्रामपंचायत मार्फत लोकल गाईड यांना ओळखपत्र देण्यात आले आहे. घारापुरी ग्रामपंचायतच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना सेवा सवलती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यात येतात. ग्रामपंचायत जनकल्याणासाठी नेहमी अग्रेसर असल्यामुळे जनतेने या ग्रामपंचायतच्या कार्याचे कौतुक केले आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अकाऊटंट पाहिजे. पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट, गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्किंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे. मो. ७७५८९७५४०७
- अलिबागमध्ये कळंबादेवी मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबाग रेवस रोड (RCF) कंपनीजवळ भाड्याने दोन सेमी फर्निश रुम देणे आहेत. गेस्ट हाऊस अथवा लॉजिंग साठीही चालू शकेल. संपर्क : ७५०७३०१३५१/९२७०४९८०९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# कंत्राटी कामगारांचा संताप उफाळला

## कोरस कंपनी गेटवर ठिय्या आंदोलन

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्र पुन्हा एकदा संतप्त घोषणांनी दणाणून गेले आहे. येथील कोरस इंडिया लिमिटेड कंपनीतील कंत्राटी कामगारांनी विविध मागण्यांसाठी मंगळवारी (दि.१४) सकाळी कंपनीच्या मुख्य गेटवर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. तब्बल चार तास चाललेल्या आंदोलनापुढे कंपनी प्रशासनाला कर्मचाऱ्यांपुढे झुकावे लागले आणि मागण्यांची पुर्तता करण्याचे आश्वासन देण्यात आले.



गेल्या महिनाभरापासून दिवाळी उंबरठ्यावर असतानाही धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कोरस इंडिया कंपनीतील कामगारांना बोनस तर सोडाच पगार देखील मिळालेला नाही. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या घरात आनंदाचा किरण नसून काळोखी निराशा दाटलेली आहे. कंपनी प्रशासनाकडून लवकरच पगार होईल, अशी खोटी आशा देण्यात येते. मात्र, कामगारांच्या पोटाची खळगी भरणारा पगाराचा दिवस उजाडतच नाही. दिवाळी तोंडावर आली असून कुटुंबियांना नविन कपडे, मुलांना फटाके आणि घरात दिवे लावायचे देखील वांदे झाले आहेत. त्यामुळे आम्ही दिवाळी कशी साजरी करायची, असा सवाल करत शेकडो कंत्राटी कामगारांनी कोरस इंडिया कंपनीच्या गेटसमोर ठिय्या देत संताप व्यक्त केला. यावेळी 'फक्त आश्वासन नाही, हक्क द्या', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी आंदोलनकर्त्या कामगारांनी स्पष्ट इशारा दिला की, जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत कोणताही कामगार कंपनीत पाऊल ठेवणार नाही, असा इशारा दिला.

कामगार संघटनांचे म्हणणे आहे की, गेल्या अनेक महिन्यांपासून उत्पादनाचा संपूर्ण भार कंत्राटी कामगार सांभाळत आहेत; परंतु, त्यांना योग्य तो मोबदला दिला जात नाही. त्यामुळे हा कामगारांवर आर्थिक अन्याय आहे. दिवाळी पगाराशिवाय कशी साजरी करायची, तसेच, वेळोवेळी कंपनीने दिलेली आश्वासने फक्त शब्दांपुरतीच राहिली आहेत. असे सांगत कंपनी प्रशासनाविरोधात प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला.दरम्यान, कंपनी प्रशासनाविरोधातील हे आंदोलन तब्बल चार तास चालले. अखेर कंपनी प्रशासनाला कामगारांसमोर झुकावे लागले.

यादरम्यान, कोरस इंडिया कंपनी प्रशासनात आणि कर्मचाऱ्यांत यावर चर्चा झाली. या चर्चेत कंपनीच्या एच.आर. विभागाच नवनाथ पावले यांनी, कंपनीतील सर्व कामगारांचा पगार आणि एल.टी.ए.त्वरित दिला जाईल; तर, बोनस बुधवारी (दि.१५) दुपारपर्यंत वितरित होणे अपेक्षित आहे, असे त्यांनी सांगितले.

# खोपटा-कोप्रोली रस्त्याच्या कामात दिरंगाई

- **प्रवाशांचा जीव मुठीत धरुन प्रवास**
- **उरण सामाजिक संस्था करणार निदर्शने**

| उरण | प्रतिनिधी |

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या माध्यमातून खोपट-कोप्रोली रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम गेल्या काही महिन्यांपासून मंजूर झाले आहे. मात्र, त्या कामात दिरंगाई केली जात असल्याने उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गुरूवारी (दि.१६) सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठेकेदार यांच्या विरोधात खोपटा पुलाजवलील रस्त्यावर निदर्शने करण्यात येणार आहेत.

खोपटा-कोप्रोली हा रस्ता अनेक वर्षांपासून नादुरूस्त आहे. उरण-पूर्व विभागात सीएफएस गोदामे व कंटेनर यार्डची वाढ झाल्यामुळे या रस्त्यावरून कंटेनर आणि इतर जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत आहे. त्यामुळे या मार्गावर मोठं मोठे खड्डे पडले आहेत. या खड्डेमय रस्त्यावरून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

तसेच, अरूंद रस्ता त्यात कंटेनरची अवैध पार्किंग यामुळे वाहतूक कोंडी होऊन प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दोन वर्षांपूर्वी या रस्त्यावर काही कोटी रूपये खर्च करण्यात आले होते. परंतु, ते काम निकृष्ट दर्जाचे निघाल्याने हा रस्ता पुन्हा खड्डेमय झाला आहे.

दरम्यान, या रस्त्यासाठी काही महिन्यांपूर्वी निधी मंजूर झाला असून ठेकेदाराची देखील नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे काम होईल, अशी अपेक्षा होती. परंतु, आता पावसाळा जाऊन सुद्धा या रस्त्याच्या कामाला मुहूर्त मिळालेला नाही. त्यामुळे प्रवासी वर्गाला खड्ड्यातून प्रवास तर करावा लागतच आहे, त्यात प्रचंड प्रमाणात धुळीचाही सामना करावा लागत आहे.

एकंदरीत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या अत्यंत गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधावे, यासाठी उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गुरूवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास खोपटा पूलाजवळील रस्त्यावर निदर्शने केली जाणार आहेत. त्यात नागरिकांनी देखील मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उरण सामाजिक संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## रिक्षा स्टँडसाठी झाडांची कत्तल



| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण रेल्वे स्थानकावर सुमारे २० लाख रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या उद्यानातील झाडे तोडून त्याजागी रिक्षा स्टँडसाठी कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. स्थानकातच विपुल जागा उपलब्ध असतानाही रिक्षा स्टँडसाठी उद्यानातील हिरवळ नष्ट केल्याने रेल्वे प्रशासनाच्या विरोधात प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे. दोन वर्षांपूर्वी उरण-नेरुळ प्रवासी रेल्वे वाहतूक सुरू करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात उरण स्थानकाच्या आवारात प्रवेशद्वाराजवळ एक उद्यान तयार करण्यात आले होते. या उद्यानात विविध प्रकारची झाडे लावून उद्यान विकसित करुन हिरवळ तयार करण्यात आली होती. मात्र, या ठिकाणी रिक्षा स्टँड उभारण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून उद्यानातील २० लाख रुपये खर्च करून जोपासण्यात आलेली झाडे तोडण्यात आली. त्या जागी कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. स्थानकातच इतरत्र जागा उपलब्ध असताना रिक्षा स्टँडसाठी हिरवळ नष्ट करण्याचा रेल्वे प्रशासनाच्या कामामुळे अनेक प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.




● दीपावलीचा सण काही दिवसांवर येऊन ठेपल्याने पनवेलच्या लाईन आळीत रंग, प्रकाश आणि कलेचा उत्सव सुरू झाला आहे. येथील कंदील बनवणारे कारागीर मोठमोठ्या कंदीलांवर शेवटचा हात फिरवत आहेत. यावर्षी आकर्षक आणि भव्य कंदीलांची मागणी प्रचंड वाढली आहे. त्यामुळे लाईन आळीत संपूर्ण वातावर कंदीलाच्या उजेडात न्हाऊन निघाले आहे. (छायाचित्र- राजेश डांगळे)

## मीनाताई ठाकरे वाचनालयात 'सुलेखन'

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपरिषदचे माँसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सुलेखन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठी शब्द आणि अंक लेखनाचे गाडे अभ्यासक मनोहर जामकर यांनी विद्यार्थ्यांकडून सोळाखडीचे प्रदर्शनीच्या माध्यमातून प्रत्यक्ष लेखन करून घेतले. या शिबिराला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. यावेळी ॲड. पल्लवी जगदाळे, ॲड. निरंतर सावंत, दिपक वायदांडे, चेतन सोदारी, अलंकार म्हात्रे, नाझीया शेख, नंदन पानसरे, हर्षवर्धन पवार, कल्पेश देवरे, डॉ. प्रतिक टोगे, रश्मी म्हात्रे, जय दाभोळकर, सारा पवार, जय वत्सराज व साहिल सैनी आदी उपस्थित होते.

## मुरुड शहरात माकडांचा हैदोस

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

मुरुड शहरात माकडांनी मोठा उच्छाद मांडला आहे. माकडांच्या वाढलेल्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांने मोठे आर्थिक नुकसाना सहन करावे लागत आहे. मुरूडसह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंबा आणि काजू याबरोबर इतर फळांचे उत्पन्न घेतले जाते. तसेच, भाजी-पाला व भात शेती देखील मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र, गेली काही वर्षे फळबागा आणि शेतीपिकांचे माकडांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आणि बागायतदार हवालदिल झाला आहे. त्यामुळे त्याला दरवर्षी मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. तसेच, रोज सकाळच्या सुमारास मुरुड शहरातील बाजारपेठेतील घरांच्या छपरावर मोठ्या संख्येने माकडे उड्या



मारत असतात. त्यामुळे छपरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. तसेच, घराची खिडकी उघडी असली तर घरातील खाण्याच्या वस्तू उचलून नेतात. त्यामुळे महिला व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी दांडगुरीचे शेतकरी शरद खेडेकर यांनी वनखात्यात अनेक वेळा तक्रार केल्या आहेत. परंतु, वनखात्याकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.

## बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह सापडला

| कोलाड | प्रतिनिधी |

पहूर गावातील बाळाराम गंगाराम पवार (७०) हे रविवारी (दि.१२) सकाळच्या सुमारास काहीही न सांगता घरातून बाहेर पडले होते. दिवसभरात ते पुन्हा घरी न परतल्याने घरच्यांसह गावकऱ्यांनी शोधकार्य सुरू केले. मात्र हरवलेल्या व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. ग्रामपंचायत सरपंच, पहूर यांच्या माध्यमातून सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला माहिती देण्यात आली. या संस्थेने सोमवारी (दि.१३) ड्रोनच्या साहाय्याने शोधकार्य सुरू केले. गावापासून २ किलोमीटर अंतरावर असलेल्या एका धरण परिसरात हरवलेल्या व्यक्तीचा मृतदेह आढळून आला.

## राकेश कोकळे निवडणुकीच्या रिंगणात

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक आगामी काळात होणार आहे. नुकतेच सार्वत्रिक निवडणुकीसाठी माथेरान नगरपरिषदेच्या २० जागांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. माथेरान शहरात धनगर समाजाची मोठी वस्ती असून धनगर समाजाचे नेतृत्व करणारे राकेश कोकळे यांच्या माध्यमातून अनेक उपक्रम धनगर समाजाकडून राबविले जात आहेत. त्याचवेळी माथेरान जंगलात पर्यटकांनी टाकलेले प्लास्टिक तसेच अन्य टाकाऊ साहित्य हे जंगलातील विविध भागात जाऊन, प्रसंगी दरीमध्ये उतरून ते सर्व प्लास्टिक काढण्याचे कार्य राकेश कोकळे यांच्याकडून गेली चार वर्षे अविरत सुरु आहे. त्याचवेळी माथेरान शहरात धनगर साजाच्यावतीने दसरा उत्सव साजरा करण्याची सुरुवात त्यांनी केली आहे.

त्याचप्रमाणे विविध सामाजिक कार्ये त्यांच्याकडून केली गेली आहेत. त्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणूकीमध्ये राकेश कोकळे यांनी प्रभाग सहामधील नागरिकांचा मागास प्रवर्ग जागेवरून निवडणूक लढवावी, अशी मागणी पुढे आली आहे.

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भेसळीला बसणार आळा | अन्न, औषध प्रशासनाकडून विशेष तपासणी मोहीम**

# दुग्धजन्य पदार्थांवर राहणार करडी नजर

| पनवेल | प्रतिनिधी |

सणासुदीच्या काळात मिठाई, फराळ आणि गोड पदार्थांची मागणी वाढते. मात्र, या काळात दुग्धजन्य पदार्थात भेसळ होण्याची शक्यता जास्त असल्याने अन्न व औषध प्रशासनाने सणासुदीसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना चांगल्या प्रतिची मिठाई व फराळ उपलब्ध होणे हा आहे. मात्र, ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन एफडीए प्रशासनाने केले आहे. याशिवाय, मिठाईची मुदत संपण्याची ही तारीख त्यावर लिहावी, असे आवाहन करण्यात



आले आहे.

मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात. त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**प्रशिक्षण, जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन**
**२५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा या नावाने विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे. या मोहिमेत राज्यात नमुने गोळा कारण्यासोबत नागरिकांना प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न होणार आहेत. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे.**

- **नागरीकांना मिठाई, फराळ खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन**

सणासुदीच्या काळात, जेव्हा मिठाई आणि फराळ यांची मागणी वाढते, तेव्हा या मोहिमा अधिक महत्त्वाच्या ठरतात, कारण या काळात दुग्धजन्य पदार्थ आणि इतर पदार्थांमध्ये भेसळ होण्याची शक्यता जास्त असते. दुधामधून भेसळ रोखणे, पनीरसदृश्य अनालॉग वापर टाळणे आणि गुणवत्तेची नियमित तपासणी करणे या उपाययोजनांमध्ये समावेश आहे. या माध्यमातून कोलेस्ट्रॉल वाढणे, वजन वाढणे आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ नयेत, असा प्रयत्न आहे.

मोहीम दरम्यान नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ वर कळवता येतील. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुरवठा कमी आणि मागणी जास्त असतानाही भेसळ टाळण्यासाठी नागरिक, अन्न व्यावसायिक आणि शासनाने एकत्र काम करावे, असा आग्रह आहे.



# चाईल्ड केअर तर्फे विशेष उपक्रम

**उरण :** चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे उरण येथील सावित्रीबाई फुले झोपडपट्टी अन्नदान व बालसंस्कार केंद्रातील लहान मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे कलाकार किरण घरत यांचा चाईल्ड केअर सामाजिक संस्थेतर्फे सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नरेश म्हात्रे यांनी संस्थेचे कौतुक केले व त्यांनी चाईल्ड केअर सामाजिक संस्थेला शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थापक अध्यक्ष विकास कडू, कार्याध्यक्ष मनोज ठाकूर, विक्रांत कडू, सदस्य अभिषेक माळी, विवेक कडू, नरेश म्हात्रे, ॲड. विजेंद्र पाटील, विठ्ठल ममताबादे आदींसह बालसंस्कार केंद्रातील सेविका भारती पाटील, किरण घरत, प्रियांका घरत व सावित्रीबाई बाई फुले झोपडपट्टीमधील शेकडो महिला व लहान मुले उपस्थित होते.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) गितांजली प्रभाकर देशमुख<br>२) राहुल अशोक जैन<br>३) नरेंद्र पुनमचंद शहा | २६ | १० | ०-१०-४० | ०.४२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १५/१०/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| विजय सुरेश कोतेकर | २६ | १२ | ०-०७-१० | ०.८० |
| | २४ | २क | ०-०८-६० | ०.९४ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १५/१०/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मालक श्री. आदित्य हर्षवर्धन मंगलदास, तसेच व्हिक्टोरिया मिल्स लिमिटेडचे संचालकही हे आमच्या अशिलांना विक्री करण्यासाठी चर्चेच्या प्रक्रियेत आहेत तसेच व्हिक्टोरिया मिल्स लिमिटेड, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व्हिक्टोरिया हाऊस, पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ यांनी मालकांद्वारे आमच्या अशिलांना खालील विवरणीत सदर मालमत्तेच्या अशा विक्रीस मंजुरी देण्याचे मान्य केले आहे जी बाब आमचे अशील व सदर मालकांदरम्यानच्या चर्चेच्या अधीन असेल.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता व/वा तिच्या कोणत्याही भागाविरोधात वा संदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, उत्तराधिकार, उप-भाडेकरार, सुविधाधिकार, धारणाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अशा दाव्यांच्या वा हरकतीच्या जी बाब असेल , तिच्या सहाय्यक दस्तावेजांसमवेत अधोहस्ताक्षरितांना त्यांचा पत्ता एएलएमटी लीगल, कार्यालय क्र. ४५-४६, ४ था मजला, ॲटलांटा बिल्डिंग, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१ येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असा कोणताही दावा वा हरकत अस्तित्वात नाही असे गृहीत धरण्यात येईल व स्वीकारण्यात येईल व / वा ते अस्तित्व विहीन/अधित्यागित/ परित्यागित समजण्यात येईल व तत्पश्चात आमचे अशील हे आमचे अशील व सदर मालकांदरम्यान झालेल्या चर्चेनुसार सदर मालमत्तेची विक्री पूर्ण करण्याची प्रक्रिया करतील.

**अनुसूची**

पुढील विवरणीत बिगरशेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, जमीन मोजमापित ०-३४-६० एच. ए. (३४.६० आर) अर्थात ३४६० चौरस मीटर, गट क्र. ८८/५/१ (पूर्वीचा गट क्र. ८८, हिस्सा क्र. ५चा भाग, मोजमापित १-५१-२० एच.ए. (१ हेक्टर ५१.२० आर), जो ए) गट क्र. ८८, हिस्सा क्र. ३, मोजमापित ०-८३-२० एच.ए. (८३.२० आर), बी) गट क्र. ८९, हिस्सा क्र.१/२ (तसेच गट क्र. ८९ हिस्सा क्र. ए/२ म्हणूनही ज्ञात) मोजमापित ०-१८-०० एच. ए. (१८ आर) व सी) गट क्र. ८९, हिस्सा क्र. १/३ (तसेच गट क्र. ८९, हिस्सा क्र. ए/३ म्हणूनही ज्ञात) मोजमापित ०-५०-०० (५० आर) यांच्या विलीनीकरणाद्वारे तयार झाला आहे.

तसेच वरील निर्देशित सदर जमिनीवर तळ मजला अधिक १ (एक) मजल्याच्या मोजमापित ८००० चौरस फूट बिल्ट अप क्षेत्रफळाच्या विला २५ समवेत, गाव सातीर्जे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. १, दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. ८८/५/४, पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. ८८/५/२, पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. ८८/२.

दिनांक - १५ ऑक्टोबर, २०२५.
**एएलएमटी लीगलकरिता**
**सही/-**
**भागीदार**
**वकील व सॉलिसिटर्स**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बामणोली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ.स्नेहा उदय घरत, रा.२१६४, श्री हाउस, निसर्ग सोसायटी, विद्यानगर, वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड. यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत ठरवले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बामणोली, ता.अलिबाग, जि.रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | पो.ख(हे.आर) | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ४२ | ०-०४-३० | ०-००-०० | १.१९ |

तरी वर नमूद जमीन मिळकतीवर मिळकतीचे विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमाचा-संस्थांचा दावा, अपील, अर्ज, महसुल दावे/अपीले इत्यादी वगैरे अथवा अन्य कोणत्याही कोर्ट केसेस दाखल असल्यास तसेच साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसाहक्क, पोटगी, दान, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असून तिचे टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे असे समजून आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे कोणाचा कोणताही हक्क असल्यास, तो त्यांनी जाणीवपुर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. १४/१०/२०२५

सही/-
**ॲड. सचिन किशोर पाटील**
'श्रीकृपा', भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे बागमांडले ता.श्रीवर्धन जि.रायगड येथील

| अ. क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | वरकस क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | ५१० | ०-६१-०० | ०-५५-०० | ०-०६-०० | ०-३१ |
| २) | ५२४ | ०-३१-०० | ०-२९-०० | ०-०२-०० | ०-१५ |
| ३) | ४९९ | ०-११-०० | ०-१०-०० | ०-०१-०० | ०-०६ |

**जमीन मालकाचे नाव :- श्री.अमित शशांक परांजपे**

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबेकब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अत्यारपत्र, साठेकरार गहाण बोजा, भाडेपट्टा मृत्युपत्रांकित दान जप्ती लीन बक्षिस ट्रस्ट पोटगी वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हे संबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- १४/१०/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.ग स.कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

सही/-
**(ॲड. संतोष मारुती सापते)**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील वरिष्ठ विभाग अभियंत्याच्या अधिकार क्षेत्रात झाडे छाटण्याचे/तोडण्याचे काम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यूटीआरइइसी-2025-32 दिनांक: 15/10/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 4,67,960.19/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 23/10/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 06/11/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सून वगळता 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड
### निविदा सूचना

जा.क्र.मुनप/निविदा/१२०१/२०२५-२६

मा. मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून सार्वत्रिक निवडणूक सन २०२५ करिता निविदा मागविण्यात येत आहे. कामासंबंधी सविस्तर तपशील व अटी-शर्ती मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, जि.रायगड येथे दिनांक १५/१०/२०२५ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक २९/१०/२०२५ आहे.

दिनांक:- १४/१०/२०२५

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**ई निविदा सूचना क्रमांक ४७/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.. प्रदूषणग्रस्त गावांना सन २०२६ च्या उन्हाळी हंगामात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे. | ₹३६,०६,४००.०० |
| २ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... कार्यालयीन वीज कनेक्शन व इतर विविध कामांचे उपविभाग कार्यालयात स्थलांतर करणे. | ₹८,४१,६९७.०० |
| ३ | विळे-भागड ग्रोथ सेंटर पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. विळे-भागड जलशुद्धीकरण केंद्रातील क्लोरिनेटर, कॉम्प्रेसरचे स्थलांतर करणे व ९०० किलो क्लोरीन टोनरसाठी प्लिंथचे बांधकाम करणे. | ₹१४,८०,२७७.०० |
| ४ | महाड पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती .... सावित्री धरणाच्या गॅलरीपासून जॅकवेलपर्यंतच्या इनटेक पाईप लाईनमधून अंडरवॉटर डायव्हिंग सेवांच्या मदतीने ग्राउटिंग मटेरियल काढून टाकणे. | ₹१७,८८,०००.०० |
| ५ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रोहा येथील ईएसआर, बॅकवॉश टँक व शुद्ध पाण्याच्या संपला यांत्रिक पातळी गेजचा पुरवठा करणे, स्थापित करणे ज्यामध्ये प्रकाश व्यवस्था समाविष्ट आहे. | ₹१०,३२,०७०.०० |
| ६ | महाड व विळे-भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेच देखभाल व दुरुस्ती... दोन वर्षांच्या कालावधीकरीता डिझेल जनरेटर सेटची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ११,२४,८५१.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १६/१०/२०२५ ते दिनांक ३०/१०/२०२५ पर्यंत :https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १७/१०/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक २०/१०/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री. सुर्यकांत विठ्ठल चव्हाण रा.जलाराम मंदिर भाटावाड, ब्लॉक नं.डी/६, रूम नं.४, एस.जी.बार्वे नगर मुन्सिपल कॉलनी व्हीटीसी घाटकोपर वेस्ट हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी मी स्वत: आशुतोष किशनलाल बीयानी रा.६०६ जीवन विहार, ५, मानव मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई महाराष्ट्र ४००००६ विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरी वाडी | सुर्यकांत विठ्ठल चव्हाण | १८ | १४ | ०.२९.०० | ०.१८ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहोत. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १०(दहा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १५/१०/२०२५

**आशुतोष किशनलाल बीयानी**
रा.६०६ जीवन विहार,५, मानव मंदिर रोड
मलाबार हिल मुंबई-महाराष्ट्र ४००००६
मो.९००४६०००४६

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** रत्नागिरी विभागातील एकूण 18 स्थानकांमध्ये (कोलाड, माणगाव, विन्हेरे, दिवाणखवटी, खेड, अंजणी, कामथे, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, उक्शी, भोके, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड) बॅटरी रूममध्ये बॅटऱ्या ठेवण्यासाठी पायऱ्यांसारखा प्लॅटफॉर्म तयार करणे तसेच त्या पायऱ्या व फरशीसाठी आम्लप्रतिरोधक टाइल्स बसविणे. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-एसटीपीपीएफ-2025-01 दिनांक: 15/10/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹12,28,175.62/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 23/10/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 06/11/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** मानसून सहित 4 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद मौजे कुरूळ ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमच्या अशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक यशवदा यशवंत घाडगे वगैरे १७ यांच्याकडून कायमस्वरूपी करण्याची ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दंगदावा, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण इत्यादी स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| कुरुळ, ता.अलिबाग | ५०/२ | एकुण ०-०९-०० | ०.१२ |

अलिबाग
दिनांक : १४/१०/२०२५

**ॲड. प्रियांका किशोर बिर्जे**
**जिल्हा न्यायालय अलिबाग**

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र. ३५९/२०२५

१ श्री. शेखर शंकर जोशी
रा. आक्षी, ता.अलिबाग, जि. रायगड
२. श्री. सुहास वामन जोशी
रा. ७०४, दि पर्रल (राजमणी) को.ऑप हौ.सो.लि इकसार योगी नगर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई- ४०० ०९१ — अपिलार्थी

विरुद्ध

१ श्री. प्रभाकर रामचंद्र घाडगे
२ श्री. प्रविण रामचंद्र घाडगे
३ श्रीम. प्रविणा अजय भगत उर्फ प्रविणा रामचंद्र घाडगे
रा. वाडगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
४. श्रीम. चंद्रभागा रामचंद्र घाडगे
रा. कुरळ, ता. अलिबाग, जि. रायगड
५ श्रीम. सिताबाई सिताराम घाडगे
रा.बि.विंग, रुम नं. २०१, बालाजी ग्रीन सिटी, उत्कर्ष नगर,
पेण, ता. पेण, जि. रायगड
६ सुरेश सिताराम घाडगे मयततर्फे वारस
६/१ श्री. अक्षय सुरेश घाडगे, रा. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
६/२ श्री. अभिजित सुरेश घाडगे, रा. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
७ श्री. महेश सिताराम घाडगे, रा. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
८ श्री. दिनेश सिताराम घाडगे — उत्तरार्थी
रा.बि विंग, रुम नं.२०१, बालाजी ग्रीन सिटी, उत्कर्ष नगर
पेण, ता. पेण, जि. रायगड
९ श्रीम. सुरेखा प्रल्हाद पाटील, रा. भुते, ता. अलिबाग, जि. रायगड
१० श्रीम. यशोदा यशवंत घाडगे, रा. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
११ श्री. सुधाकर यशवंत घाडगे, रा. कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड
१२ श्रीम. वैजयंती कमळाकर पिंगळे
रा. कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड
१३ मधुकर विठ्ठल घाडगे मयत तर्फे वारस
१३/१ श्रीम. वंदना मधुकर घाडगे
१३/२ श्री. अविनाश मधुकर घाडगे
१३/३ श्रीम. अंजली अरविंद भोपी उर्फ विद्या मधुकर घाडगे
रा.बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड
१४ तलाठी सजा बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड
१५ मंडळ अधिकारी नागांवस ता.अलिबाग, जि. रायगड
१६ श्रीम.अनिता अरुण भावे
रा.३ सुविधा आनंद अपार्टमेंट, प्लॉट नं.११२, प्रियांका पार्क,
श्रीनाथ नगर, गणराज मंडळ कार्यालयाजवळ, बाणेर, पुणे-४५

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक/गट क्र.५०/५, क्षेत्र ०-३८-०० हे.आर.आकार ०.५८ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.१३/२०२४ दि.०८-०७-२०२५ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब,अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणांमध्ये दि. २७-१०-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १३-१०-२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबागकरीता**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका सदर सदनिकेचे विद्यमान मालक श्रीमती भानुमती काशिनाथ पडते यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील स.नं.१८/१ प्लॉट नं.१, स.नं.१८/१ प्लॉट नं. २, स.नं.१८/१ प्लॉट नं.३, एकूण क्षेत्र ८०० चौ.मी. या बिनशेती मिळकतीवरील कृष्णवाटिका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या इमारतीतील बी विंगमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.२०२, ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र.८४२/७, क्षेत्र ३५९.२५ चौ.फुट (३३.३९ चौ.मी.) बिल्टअप ही निवासी सदनिका.

तरी सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसलेही प्रकारचा हक्क-हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व तो तुमच्यावर बंधनकारक राहील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख :- १३-१०-२०२५

सही/-
**ॲड. नंदकुमार पां.तांबडकर**
मु.पो.सुडकोली,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. ९२७२२७४०५५

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहिर सुचना
**मलनि:स्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मलनि:स्सारण विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत उत्पादकांकडुन (Manufacturer) वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

**पनवेल महानगरपालिकेकरीता मोबाईल टॉयलेट खरेदी करणेबाबत.**

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/मल.वि./४८२५/प्र.क्र.२०/१३६१/२०२५
दिनांक-१४/१०/२०२५

सही/-
**उप आयुक्त (आरोग्य)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री.रविंद्र गोपाळ यादव यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिल श्री.तुषार बाळु घरत यांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे

**मौजे कोठींबे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र | उपविभाग क्र | क्षेत्र है.आर.चौ.मी | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|
| ७० | १ | ०.११.६० | ०.९० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांस संपर्क साधावा अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दिनांक : १५/१०/२०२५

**ॲड. प्रणिता कल्पेश पाटील**
बी. कॉम. एल. एल. बी,
पत्ता-मु. वदप, पो. गौरकामत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. नं. ७३८५५९३००८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-कळंब, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पाँ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. अब्दुल रेहमान एच. एच वडगामा | १३१ | ३ | १-०७-०० पो. ख<br>०-०३-३० एकुण<br>१-१०-३० या पैकी<br>०-८६-३० क्षेत्र मिळकत | १२-४६ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १४/१०/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### चिनप्पाला स्क्वॅश स्पर्धेचं विजेतेपद

**योकोहामा :** दोन वेळा आशियाई विजेती ठरलेली जोशना चिनप्पा हिने सोमवारी योकोहामा येथे आयोजित जपान ओपन स्क्वॅश स्पर्धेचे महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. जागतिक क्रमवारीत



११७ व्या स्थानावर असलेल्या आणि स्पर्धेत बिगरमानांकित असलेल्या ३९ वर्षीय जोशनाने अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत ५३ व्या स्थानावर असलेल्या इजिप्तच्या हाया अलीला ११-५, ११-९, ६-११, ११-८ अशा फरकाने पराभूत करून पीएसए चॅलेंजर स्पर्धेतील जेतेपदावर आपली मोहोर उमटवली. हाया अलीविरुद्ध चिनप्पाची ही दुसरी लढत होती. यापूर्वी याच वर्षी बर्मुडा येथील दुसऱ्या फेरीत त्यांचा सामना झाला होता. यात भारतीय खेळाडूला ११-८, १०-१२, ५-११, ११-९, ११-८ असा पराभव पत्करावा लागला होता. माजी जागतिक क्रमवारीत १० व्या स्थानावर असलेली चिनप्पा, २०२३ हँगझू आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर गुडघ्याच्या शस्त्रक्रियेतून सावरल्यानंतर दमदार फॉर्ममध्ये आहे. त्या स्पर्धेत भारताला कांस्यपदक मिळवून देण्यात तिचा महत्त्वाचा वाटा होता.

### न्यूझीलंडचा संघ टाकणार कात



**नवी दिल्ली :** टी२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात भारत आणि श्रीलंकेत होणार आहे. या स्पर्धेपूर्वी सर्वच संघ खेळाडूंची मोर्चेबांधणी करत आहेत. कारण या स्पर्धेसाठी आता फक्त तीन महिन्यांचा अवधी शिल्लक राहीला आहे. या स्पर्धेपूर्वी न्यूझीलंडने संघात मोठा बदल केला आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात १८ ऑक्टोबरपासून तीन टी२० आणि तीन वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेसाठी न्यूझीलंडने १४ सदस्य संघाची घोषणा केली आहे. फिन एलन पायाच्या दुखापतीमुळे मालिकेसाठी उपलब्ध नाही. पायाच्या समस्येने ग्रस्त असलेल्या एडम मिल्नेलाही मालिकेतून बाहेर काढण्यात आले आहे. तर विल्यम ओफरोर्कनेही पाठीच्या समस्येमुळे मालिकेतून माघार घेतली आहे.ग्लेन फिलिप्स देखील कंबरेच्या दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्धच्या मालिकेला मुकला आहे. तर प्रमुख वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन हॅमस्ट्रिंगच्या समस्येमुळे मालिकेसाठी उपलब्ध नाही. केन विल्यमसनला संघात स्थान मिळाले नाही. पण इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत खेळण्याची शक्यता आहे.

### सात्त्विक-चिरागचे जेतेपदाकडे लक्ष



**डेन्मार्क :** भारताचे अव्वल दुहेरीचे खेळाडू सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी मंगळवार (दि. १४) खेळवल्या जाणाऱ्या ९ लाख ५० हजार बक्षीस रकमेच्या डेन्मार्क ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत हंगामातील पहिले जेतेपद मिळवण्यासाठी महत्त्वाकांक्षी असतील. या वर्षात सात्त्विक व चिराग यांना विजयश्रीने सातत्याने हुलकावणीही दिली असून येथे तरी ते ही कसर भरून काढू शकणार का, इतकीच उत्सुकता असेल. आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या या सहाव्या मानांकित जोडीचा पहिला सामना स्कॉटलंडच्या ख्रिस्तोफर ग्रिमली आणि मॅथ्यू ग्रिमली यांच्याशी होईल. सात्त्विक आणि चिराग यांनी या हंगामात सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. त्यांनी हाँगकाँग आणि चायना मास्टर्स सुपर ७५० स्पर्धांमध्ये सलग अंतिम फेरी गाठली, तसेच पॅरिसमध्ये दुसरे जागतिक कांस्यपदक पटकावले आहे. त्यामुळे सात्त्विक-चिरागचे हंगामातील पहिल्या जेतेपदाकडे लक्ष लागले आहे.

### आंबडस विद्यालयाची चमकदार कामगिरी



**चिपळूण :** खेड तालुक्यातील तळे हायस्कूल येथे नुकत्याच पार पडलेल्या खेड तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत आंबडस विद्यालयातील खेळाडूंनी दमदार खेळ करून घवघवीत यश संपादन केले. धावणे, हर्डल्स, चालणे, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक, हातोडाफेक, थाळीफेक तसेच रिले अशा विविध प्रकारात शाळेच्या खेळाडूंनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले. नेहा मोरे हिने ८०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक मिळवला तर ४०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय, ३००० मीटर चालण्यात द्वितीय आणि लांब उडीत तृतीय क्रमांक पटकावला. समीक्षा कदम हिने ४०० मीटर धावण्यात प्रथम तसेच ४०० मीटर हर्डल्समध्ये तृतीय क्रमांक मिळवला. श्रेया आंब्रे हिने ४०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवून चमक दाखवली. पार्थ कदम याने ४०० मीटर हर्डल्समध्ये आणि थाळीफेकीत प्रथम क्रमांक पटकावला. सार्थक गोरिवले याने ४०० मीटर हर्डल्समध्ये तृतीय तर हातोडा फेकीत द्वितीय क्रमांक मिळवला. आस्मी धाडवे हिने ३००० मीटर चालण्यात प्रथम क्रमांक मिळवला. कावेरी सोलकर हिने गोळाफेकमध्ये द्वितीय, भालाफेकमध्ये प्रथम, हातोडा फेकमध्ये तृतीय तसेच थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. समीक्षा कांजवे हिने हातोडा फेकमध्ये प्रथम आणि थाळीफेकमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. संकेत खरात याने लांब उडीत चतुर्थ क्रमांक पटकावला तर सानवी जाधव हिने अंडर-१४ गटात ८० मीटर हर्डल्समध्ये तृतीय क्रमांक मिळवला. रीले स्पर्धेतही आंबडस विद्यालयाने आपली ताकद सिद्ध केली.

---

### वेस्ट इंडिजचा सुपडासाफ

# भारताने जिंकली दिल्ली कसोटी

**■ २-0 ने मालिका घातली खिशात**



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट संघाने दिल्ली कसोटीच्या पाचव्या दिवशी वेस्ट इंडिजविरुद्ध दुसरा सामना ७ विकेटने जिंकला. यासह, भारतीय संघाने मालिका २-० अशी सहज जिंकली. सामन्याच्याशेवटच्यादिवशीभारताला फक्त ५८ धावांची आवश्यकता होती आणि नऊ विकेट्स शिल्लक होत्या. साई सुदर्शन आणि शुभमन गिलच्या रुपात भारतीय संघाला दोन धक्के सहन करावे लागले. मात्र केएल राहुलने एका टोकाला धरून संघाला आणखी एक सहज विजय मिळवून दिला. सामन्यात एकुण ८ विकेट घेणाऱ्या कुलदीप यादवला सामनावीर तर रवींद्र जडेजाला मालिकावीरचा पुरस्कार देण्यात आला.

१२१ धावांचा पाठलाग करताना, भारतीय संघाने चौथ्या दिवसाच्या अखेरीस एक विकेट गमावून ६३ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात यशस्वी जैस्वाल (८) च्या रूपात भारताला मोठा धक्का बसला. मात्र भारतीय संघाने चौथ्या दिवसाचा शेवट १ बाद ६३ धावांवर केला. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात केएल राहुलच्या नाबाद ५८ धावांच्या खेळीमुळं भारताला लक्ष्याचा पाठलाग करण्यास मदत झाली. पाचव्या दिवशी भारताने साई सुदर्शन (३९) आणि शुभमन गिल (१३) यांचे बळी गमावले, परंतु वेस्ट इंडिजला पुन्हा सामन्यात आणण्यासाठी ते पुरेसे नव्हते.

पहिल्या डावाच्या आधारे भारताकडे २७० धावांची आघाडी होती. यानंतर फॉलोऑन मिळालेल्या वेस्ट इंडिजनं दुसऱ्या डावात ३९० धावा केल्या, ज्यामुळे भारतासमोर विजयासाठी १२१ धावांचे लक्ष्य होते. वेस्ट इंडिजचा दुसरा डाव सुरुवातीला पुन्हा एकदा डळमळीत झाला, परंतु सलामीवीर जॉन कॅम्पबेलनं शाई होपसह तिसऱ्या विकेटसाठी १७७ धावांची भागीदारी करून संघाला सावरलं.

कॅम्पबेल ११५ धावांवर बाद झाला, तर शाई होपनं १०३ धावा केल्या. याशिवाय, जस्टिन ग्रीव्हजनं ५० धावा केल्या. कर्णधार रोस्टन चेसनं संघाच्या खात्यात ४० धावांचे योगदान दिले. भारताकडून यादव आणि जसप्रीत बुमराहने प्रत्येकी तीन, तर मोहम्मद सिराजने दोन बळी घेतले. जडेजा आणि वॉशिंग्टनने प्रत्येकी एक बळी घेतला.

**पहिल्या डावात ५१८ धावा**

या सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेत भारताने ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. सलामीवीर जैस्वालने १७५ धावा केल्या, तर कर्णधार गिलने नाबाद १२९ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून जोमेल वॉरिकननं सर्वाधिक तीन बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल, वेस्ट इंडिजचा संघ पहिल्या डावात केवळ २४८ धावांवर बाद झाला.

---

## आफ्रिकेचा बांगलादेशवर विजय

**| विशाखापट्टणम | वृत्तसंस्था |**

मेरिझॅन कॅप (५६), ट्रियॉन (६२) व नदिने डी क्लर्कने (३७) यांनी दडपण झुगारून सोमवारी येथे झालेल्या रोमांचक महिला विश्वचषक सामन्यात दक्षिण आफ्रिकेला बांगला देशवर ३ गडी राखून विजय मिळवून दिला. वास्तविक, २३३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेने एकवेळ २३ व्या षटकात ७८ धावांत ५ गडी गमावले होते. पण, अष्टपैलू खेळाडू मेरिझॅन कॅप आणि क्लो ट्रियॉन यांनी सहाव्या गड्यासाठी ८५ धावांच्या महत्त्वपूर्ण भागीदारीच्या जोरावर विजय खेचून आणला. पुढे क्लर्कने त्यावर शिक्कामोर्तब केले.

दक्षिण आफ्रिकेने अखेरीस केवळ ३ चेंडू बाकी असताना हे लक्ष्य गाठले. कॅप आणि ट्रियॉन बाद झाल्यानंतर क्लर्कने २९ चेंडूंत नाबाद ३७



धावांची खेळी केली. तिला शूर्णा अख्तरने लाँग-ऑफवर जीवदान दिले होते. त्यानंतर डी क्लर्कने चौकार आणि षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. डी क्लर्कने यापूर्वी भारताविरुद्धही सामना जिंकून देणारी खेळी केली होती. प्रारंभी युवा अष्टपैलू खेळाडू शूर्णा अख्तरने केलेल्या झंझावाती ३५ चेंडूंतील नाबाद ५१ धावांच्या खेळीच्या जोरावर बांगला देशने संथ सुरुवातीनंतरही ६ गडी गमावून २३२ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली.

शर्मिन अख्तर (५०) आणि कर्णधार निगार सुलताना (३२) यांनी तिसर्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी करून बांगला देशच्या डावाला आकार दिला होता.

## रोहित-विराटमुळे क्रिकेट रंगणार

**मुंबई:** भारताच्या देशांतर्गत क्रिकेटला नवा श्वास देणारी बातमी समोर आली आहे. भारताचे दिग्गज फलंदाज रोहित आणि विराट हे दोघेही आगामी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळताना दिसणार आहेत. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या दिशेने पाहता खेळाडूंनी घरच्या स्पर्धांत सातत्य ठेवणे अत्यावश्यक आहे. देशांतर्गत क्रिकेट हाच राष्ट्रीय संघाचा पाया आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या भूमिकेनंतर विराट आणि रोहित या दोघांनीही आपला अनुभव आणि उपस्थिती देशांतर्गत क्रिकेटकडे परत नेण्याचा निर्णय घेतला. दोघांनीही २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफीसाठी आपली उपलब्धता निश्चित केली असून ते किमान तीन ते चार सामने खेळतील अशी अपेक्षा आहे.

## भारताचा ब्रिटनवर थरारक विजय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



भारतानी ज्युनियर पुरुष हॉकी संघाने सुलतान जोहर कप हॉकी स्पर्धेची दमदार सुरुवात केली आहे. शनिवारी झालेल्या सामन्यात भारताने ब्रिटनवर ३-२ गोल फरकाने थरारक विजय मिळविला.

भारताकडून कर्णधार रोहित आणि रवनीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला. ग्रेट ब्रिटनसाठी मायकल रायडन आणि कॉनर ड्रेस्सी यांनी गोल केले.

पाहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांनी आक्रमक हॉकी सादर केली; परंतु कोणालाही गोल करता आला नाही. भारताला १३व्या मिनिटाला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला, जो ब्रिटिश बचावाने रोखला. २२व्या मिनिटाला मनमीत सिंगचा शॉट गोललाइनवरून क्लिअर करण्यात आला; पण लगेचच रवनीत सिंगने अप्रतिम फिनिशसह भारताला आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत सामना १-१ असा बरोबरीत राहिला.

४५व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि कर्णधार रोहितने स्ट्रिक ड्रॅग-फ्लिकद्वारे गोल करत भारताला पुन्हा आघाडी स्पर्धा मिळवून दिली. ४६व्या मिनिटाला ब्रिटनला पेनल्टी स्ट्रोक मिळाला, ज्यावर कॉनर ड्रेस्सीने गोल करत स्कोर २-२ केला. यानंतर भारताने सलग तीन पेनल्टी कॉर्नर मिळवले. त्यातील तिसऱ्या संधीवर ५२व्या मिनिटाला रोहितने जोरदार शॉट मारत निर्णायक गोल केला आणि भारताला सामना ३-२ ने जिंकून दिला.

---

## नेटबॉल स्पर्धेत ग्रेगोरियन पब्लिक रोहा स्कूलचे यश



**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा येथील ग्रेगोरीयन पब्लिक स्कुलच्या आवारात संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय नेटबॉल स्पर्धेत ग्रेगोरियन पब्लिक स्कूल किल्ला रोहाच्या सर्व नेट बॉल संघांनी आपल्या होम पिचवर उत्कृष्ट कामगिरी करत सुयश संपादित केले आहे.

यामध्ये १४ वर्ष, १७ वर्ष, व १९ वर्षाखालील मुले व मुली या तीन्हही ग्रुपमध्ये ग्रेगोरियन स्कूलच्या नेट बॉल संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये यामध्ये १७ वर्षाखालील मुले व मुली यांनी अंतिम विजेतेपद मिळविले तर १४ वर्षा खालील मुले व मुली नेट बॉल संघांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षाखालील मुलांच्या संघाने तृतीय तर मुलींच्या संघांनी द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धा सांगता समारंभात ग्रेगोरीयन पब्लिक स्कुलचे प्राचार्य फादर जोसेफ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

येथील मार्गदर्शक सुधीर जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेगोरीयन स्कुलच्या सर्वच संघांनी सर्वोत्कृष्ट खेळ केला. १७ वर्षाखालील मुले व मुलींच्या संघाची ५ नोव्हेंबरला मुंबई येथे होणा-या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्व यशस्वी खेळाडूंना प्राचार्य, शिक्षक व पालकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### राज्य कॅरम स्पर्धेत

## चैताली-महम्मद ठरले विजेते

**मुंबई :** महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आयोजित व ओ. एन. जी. सी. पुरस्कृत राज्य मानांकन कॅरम स्पर्धेला मलबेरी कॉटेज, महाबळेश्वर येथे रंगतदार शेवट लाभला. या स्पर्धेत पुरुष एकेरी गटात मुंबईच्या महम्मद घुफ्रानने प्रभावी कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. त्याने अंतिम सामन्यात मुंबईच्याच प्रशांत मोरेला २५-२२, १७-२५, २१-१५ अशा थरारक लढतीत पराभूत केले. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात जळगावच्या संदीप दिवेने मुंबईच्या सिद्धांत वाडवलकरवर मात केली.महिला एकेरी गटात ठाण्याच्या चैताली सुवारे हिने आपल्या दमदार खेळाने राज्यविजेतेपद पटकावले. चैतालीने अंतिम सामन्यात मुंबईच्या रिंकी कुमारीवर १९-१६, १७-२४, २१-१७ अशा चुरशीच्या लढतीत विजय मिळवला. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने मुंबईच्या ममता कुमारीला पराभूत करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

## युपी योध्दाजचा दमदार विजय

**| दिल्ली | वृत्तसंस्था |**



प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ८२ व्या सामना यू मुंबा आणि युपी योद्धाज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात यू मुंबाचे चढाईपटू अपयशी ठरले. तर दुसरीकडे युपी योध्दाजच्या चढाईपटूंनी चढाईत आणि बचावात दमदार कामगिरी केली. यासह युपी योध्दाजने हा सामना ४०- २४ या फरकाने आपल्या नावावर केला.त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात युपी योद्धाजकडून गुमान सिंगने १२ गुणांची कमाई केली. तर यू मुंबाकडून संदीप कुमारने अवघ्या ७ आणि अजित चौहानने अवघ्या ६ गुणांची कमाई केली..या सामन्यात यू मुंबाकडून पहिली चढाई करण्यासाठी अजित चौहान चढाईला आल्या. पण पहिल्याच चढाईत त्याची पकड झाली. युपी योध्दाजकडून गगन गौडाने पहिल्याच चढाईत १ गुण घेतला. पाचव्या मिनिटाला यू मुंबाने सुपर टॅकल करत संघाचं खातं उघडलं. पूर्वार्धातील १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ ६-६ ने बरोबरीत होते. मुख्य बाब म्हणजे हे सर्व ६ गुण यू मुंबाने बचाव करताना कमावले. पूर्वार्धातील १५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर दोन्ही संघ ९-९ गुणांनी बरोबरीत होते. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर युपी योध्दाजचा संघ १३-११ गुणांसह २ गुणांनी आघाडीवर होता. पूर्वार्धात आघाडीवर राहिलेल्या युपी योद्धाजने उत्तरार्धातही चांगली सुरुवात केली. यू मुंबाने देखील सुपर टॅकल करत गुणसंख्या १४-१४ ने बरोबरीत आणली. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर युपी योध्दाजचा संघ २५-१९ सह ६ गुणांनी आघाडीवर होता. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात पिछाडीवर राहिलेल्या यू मुंबाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. ११ व्या मिनिटाला यू मुंबाचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह ४ गुण घेत संघाची आघाडी ३०-२० गुणांसह १० गुणांवर पोहोचवली. मुंबाला शेवटच्या ५ मिनिटात १४ गुणांची पिछाडी भरून काढायची होती. युपी योध्दाजचा संघ ३४- २० गुणांनी आघाडीवर होता. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना यू मुंबाचा संघ तिसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह युपीची आघाडी ३९-२१ गुणांवर जाऊन पोहोचली. शेवटी युपी योध्दाजला हा सामना ४०-२४ च्या फरकाने आपल्या नावावर केला आहे.

---

**विभागीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी** | **तिरंदाजीत राज्य स्पर्धेसाठी निवड**

# सार्थकने वेधले अचूक लक्ष्यवेध

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव येथील शैक्षणिक आणि क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या गणेश यशवंत वाघरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थी सार्थक म्हामुणकर याने अचूक लक्ष्यवेध करीत विभागीय स्तरावरील तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. त्यामुळे त्याची तिरंदाजी स्पर्धेत राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्याच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सार्थकने कल्याण, जिल्हा ठाणे येथील बी. के. बिर्ला कॉलेजमध्ये १४ वर्षांखालील मुलांच्या गटात झालेल्या कोकण विभागीय स्तरावरील तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक पटकावले आहे.

सार्थक म्हामुणकर याची निवड २९ ते ३१ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

यापूर्वी देखील सार्थकने विभागीय स्तरावरील तिरंदाजी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली होती.

सार्थकच्या या अचूक तिरंदाजीतील रुपेरी कामगिरीबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, नितीन बामगुडे, गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे चेअरमन अरुण पवार, मुख्याध्यापिका मनिषा मोरे आणि शिक्षकांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा



ऑलिम्पिक स्पर्धेत खेळण्याची इच्छा अभ्यासाबरोबरच सातत्याने सराव सुरू ठेवला होता. आपल्या देशासाठी खेळण्याची आणि ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून आपल्या देशाचे नाव उज्वल करण्याची सार्थकची मनोमन इच्छा आहे. सध्या सार्थक हा येथील एकलव्य अकॅडमीत बाळू भाऊ ढेबे यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदारपणे सराव करीत आहे.

## अडसूळ ट्रस्ट कॅरम स्पर्धेत प्रसन्नची भरीव कामगिरी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आनंदराव अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित कोकण कप विनाशुल्क निवड चाचणी शालेय कॅरम स्पर्धेत पोद्दार अकॅडमी स्कूल-मालाडचा सबज्युनियर कॅरमपटू प्रसन्न गोळेने विजेतेपद पटकावले. रोमांचक अंतिम सामन्यात प्रसन्नने श्री नारायण गुरु हायस्कूल-चेंबूरच्या उमैर पठाणचा २१-१३ असा पराभव करून आपला दमदार खेळ सिद्ध केला. निर्णायक क्षणी अचूक फटके साधत त्याने प्रेक्षकांची दाद मिळवली.

विजेत्यांना प्रकाश वाघमारे, प्रमोद पार्टे, चंद्रकांत करंगुटकर, अविनाश महाडिक, लीलाधर चव्हाण यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

ही स्पर्धा को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई व कोकण क्रीडा प्रबोधिनी यांच्या सहकार्याने पार पडली. विविध जिल्ह्यांतील तब्बल ६४ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

उपांत्य फेरीत न्यू इंग्लिश स्कूल-जैतापूरचा आर्यन राऊत आणि पोद्दार अकॅडमी-मालाडचा पुष्कर गोळे उपविजेते ठरले, तर उपांत्यपूर्व स्तरावर पाटकर विद्यालय-डोंबिवलीचा शिवांश मोरे, ठाकूर रामनारायण स्कूल-दहिसरचे तीर्थ ठक्कर, शौर्य दिवेकर व मन्न भलाला यांनी उत्तम कामगिरी केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)